# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१७५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.६ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## बांगलादेशातील ५०० कैदी कारागृहातून पळाले दहशतवाद्यांचाही समावेश, भारतीय लष्कर अलर्ट मोडवर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ ढाका**

बांगलादेशात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान शेख हसीना यांनी सोमवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि देशातून पलायन केले. त्यामुळं आता बांग्लादेशात अंतरिम सरकार स्थापन झालं आहे. शेख हसीना यांनी देश सोडल्यानंतरही सध्या हिंसाचारानं बांगलादेश धुमसत असल्याचं पाहायला मिळत आहे. सध्या बांगलादेशातील घडामोडींकडे संपूर्ण भारताचं लक्ष लागलं आहे. बांगलादेशात विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळं हिंसाचार शिगेला पोहोचला आहे. शेख हसीना यांनी सोमवारी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिल्यानंतर सत्ता लष्कराच्या हाती गेली. मात्र, आंदोलकांनी देशाची सत्ता लष्कराकडे देण्यास विरोध दर्शवला आहे. दरम्यान, हिंसक जमावानं कारागृह देखील सोडलं नाही. कारागृहात घुसूनही जमावानं जाळपोळ केली. यावेळी अनेक कैदी पळून गेले. या कैद्यांमध्ये अनेक दहशतवाद्यांचाही समावेश असल्याचं सांगण्यात येत आहे. अशा परिस्थितीत भारतीय लष्करही अलर्ट मोडवर आहे.

बांगलादेशच्या माध्यमांमधून समोर आलेल्या बातम्यांनुसार, देशात सत्तापालट झाल्यानंतर परिस्थिती आणि व्यवस्था कोलमडली आहे. दरम्यान, देशातील तुरुंगही रिकामी होत असल्याचं पाहायला मिळत आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी बांगलादेशात रविवारी संध्याकाळी सहा वाजल्यापासून कर्फ्यू लागू करण्यात आला होता. मात्र, सोमवारी हिंसक आंदोलकांनी कर्फ्यु झुगारुन शेख हसीना यांच्या घराला घेराव घातला. एवढंच नाही तर, कर्फ्यू दरम्यानच शेरपूर कारागृहात हल्लेखोर लाठ्या घेऊन घुसले आणि जवळपास ५०० कैद्यांना कारागृहातून बाहेर काढलं.



### आंदोलकांकडून जाळपोळ

आंदोलकांनी शेरपूरच्या कारागृहातच नव्हे तर दमदमा कालीगंज परिसरातही घुसून आग लावली. शेरपूरचे उपायुक्त अब्दुल्ला अल खैरुन यांनी सांगितलं की, सायंकाळी पाचच्या सुमारास हल्लेखोरांनी कारागृहावर हल्ला केला. सोमवारी संतप्त जमावानं फक्त कारागृहातच नव्हे तर पोलीस ठाण्यांनाही लक्ष्य केलं. दुपारी एक वाजण्याच्या सुमारास सदर पोलीस ठाण्याला हल्लेखोरांनी आग लावली. याशिवाय, जिल्हा परिषद, जिल्हा निवडणूक कार्यालय, सोनाली बँक तसेच अनेक दुकानांची तोडफोड करण्यात आली.

## अजित पवारांच्या गटात जाता जाता सोनिया दुहान काँग्रेसमध्ये; शरद पवार गटाला धक्का

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६नवी दिल्ली**

राष्ट्रवादीच्या लेडी सिंघम अशी ओळख असलेल्या व आता शरद पवार गटात असलेल्या सोनिया दुहान यांनी अखेर काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. मे महिन्यात दुहान या अजित पवार गटात जाणार असल्याच्या चर्चा होत्या. परंतू, नंतर त्यांनीच खुलासा करत मी कोणत्याही पक्षात जाणार नाही असे स्पष्ट केले होते.

सोनिया दुहान यांच्या कार्यालयाकडून एक्स अकाऊंटवर सोनिया दुहान या आज हरियाणा काँग्रेसमध्ये जात असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. या प्रवेश कार्यक्रमाला भुपेंदर सिंह हुडा, प्रदेशाध्यक्ष उदयभान, काँग्रेस प्रभारी दीपक बावरिया आदी उपस्थित असणार आहेत असे म्हटले आहे. दुपारी १ वाजता त्यांचा पक्ष प्रवेश होणार असल्याचे ट्विटमध्ये म्हटले आहे.

माझी शरद पवारांवर निष्ठा कायम आहे, मी पक्ष सोडलेला नाही, मी कोणत्याही पक्षात जाणार नाही, असे दुहान यांनी मे महिन्यात



सांगितले होते. आता हरियाणामध्ये विधानसभा निवडणूक होणार आहे. या निवडणुकीच्या तोंडावर दुहान या काँग्रेसमध्ये जात आहेत. दुहान यांनी सुप्रिया सुळे या आमच्या लीडर कधीच होऊ शकल्या नाहीत. आमच्यासाठी शरद पवारच आमचे लीडर असे वक्तव्य करून खळबळ उडवून दिली होती.

## भारताचा 'गोल्डन बॉय' नीरज चोप्रा पुन्हा एकदा ऑलिम्पिकच्या फायनलमध्ये

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६पॅरिस**

टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताला सुवर्ण पदक जिंकून देणारा नीरज चोप्रा पुन्हा एकदा सोनेरी कामगिरी करण्यासाठी सज्ज आहे. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ च्या फायनलचे तिकीट मिळवण्यात त्याने यश मिळवले. मंगळवारी भालाफेकपटूंची पात्रता फेरी पार पडली. ऑलिम्पिकमध्ये पात्रता फेरीत ८४ मीटर भाला फेकल्यास थेट अंतिम फेरीत प्रवेश मिळतो. हे अंतर गाठणारा खेळाडू फायनलसाठी पात्र ठरतो. नीरजने पहिल्याच प्रयत्नात ८९.३४ मीटर भाला फेकून अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. त्यामुळे तो आता सलग दुसऱ्यांदा सुवर्ण पदकाला गवसणी घालतो का याकडे तमाम भारतीयांचे लक्ष लागले आहे. ८ तारखेला नीरज पदकासाठी मैदानात असेल.




भारतीय थलेटिक्स विश्वाला सोनेरी दिवसांची अनुभूती देणारा गोल्डन बॉय नीरज चोप्रा पुन्हा एकदा नवे कीर्तिमान रचण्यासाठी ८ तारखेला मैदानात उतरेल. टोकियो ऑलिम्पिकची पुनरावृत्ती करण्याबरोबरच १४० कोटी भारतीयांच्या अपेक्षांचे ओझे यावेळी नीरजच्या खांद्यावर असेल. तसेच त्याच्यासमोरचे आव्हान काहीसे कठीण असल्याचे बोलले जात आहे. कारण गेल्या काही काळापासून दुखापतींचा ससेमिरा नीरजच्या मागे लागला आहे. आज, मंगळवारी भालाफेकपटूंची पात्रता फेरी पार पडली. या फेरीत पहिल्याच प्रयत्नात नीरजने लक्ष्यापेक्षा ४ मीटर लांब भाला फेकला अन् फायनलमध्ये प्रवेश मिळवला. मागील काही कालावधीपासून नीरजने अनेकदा दुखापतीचा सामना केला.

दोहा डायमंड लीगमध्ये नीरजने ८८.३६ मीटर भाला फेकला होता. त्यानंतर खापतीमुळे ओस्ट्राव्हा येथील गोल्डन स्पाईक स्पर्धेत तो सहभागी झाला नाही. जूनमध्ये फिनलँडला झालेल्या पावो नुरमी स्पर्धेमध्ये ८५.९७ मीटर भाला फेकत नीरजने सुवर्ण पदक पटकावले.पुन्हा दुखापतीमुळे ७ जुलैला झालेल्या पॅरिस डायमंड लीगमधून त्याने माघार घेतली.

## विधानपरिषदेत घात करणाऱ्यांना काँग्रेसचा दणका; ५ आमदारांचं तिकीट कापणार?

### अमरावती मधून सुलभा खोडके यांचे नाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ अमरावती**

काही दिवसांपूर्वी झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत क्रॉस वोटिंग झाल्यामुळे काँग्रेसची चांगलीच अडचण झाली होती. मात्र पक्षाला दगाफटका देणाऱ्या या आमदारांवर कडक कारवाई केली जाणार असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी तेव्हाच जाहीर केलं होतं. त्यानंतर आता या क्रॉस वोटिंग करणाऱ्या आमदारांना आगामी



विधानसभा निवडणुकीत तिकीट न देण्याच्या सूचना थेट काँग्रेस हायकमांडकडून राज्य पातळीवरील नेत्यांना देण्याची आल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विधानपरिषद निवडणुकीत काँग्रेसच्या ज्या आमदारांनी क्रॉस वोटिंग केल्याचा संशय आहे त्यामध्ये हिरामण खोसकर, जितेश अंतापूरकर, सुलभा खोडके, झिशान सिद्दिकी आणि मोहन हंबर्डे यांचा समावेश आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत या पाचही आमदारांना काँग्रेस तिकीट देणार नसल्याचे समजते.दरम्यान, क्रॉस वोटिंगच्या आरोपामुळे ज्या आमदारांचं तिकीट कापलं जाणार आहे त्यांच्या मतदारसंघात काँग्रेसकडून युवा चेहऱ्यांना संधी दिली जाणार असल्याचीही माहिती आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस नक्की कोणत्या आमदारांचं तिकीट कापणार आणि त्यांच्या जागी कोणाला संधी देणार, हे पाहणं आता औत्सुक्याचं ठरणार आहे.

## खते, अवजारांवरील 'जीएसटी'मुळे शेतीवर आर्थिक ताण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

पिकांचा उत्पादन खर्च व त्या खर्चाच्या ५० टक्के नफा, एवढा हमीभाव देण्याची घोषणा केंद्र सरकारने केली आहे. मात्र रासायनिक खते, कीडनाशके, कृषी अवजारांवर आकारला जाणारा वस्तू व सेवा कर (जीएसटी) आणि वाढलेला उत्पादन खर्च यामुळे शेतीवरील आर्थिक ताण वाढला आहे.



'जीएसटी' लागू होण्यापूर्वी रासायनिक खतांवर शून्य ते सहा टक्के कर लागत होता. सध्या सर्व खतांवर ५ टक्के दराने 'जीएसटी' लागू आहे. त्यामुळे खरे तर खतांच्या किमती कमी होणे अपेक्षित होते. पण, सल्फ्युरिक ॲसिड आणि अमोनियासारख्या खतांच्या निर्मितीमध्ये वापरल्या जाणाऱ्या निविष्ठा, कच्च्या मालावर १८ टक्के दराने 'जीएसटी' लावल्याने खतांचे दर वाढले असून त्याचा भार शेतकऱ्यांवर पडत आहे. युरिया, डीएपी या मुख्य अन्नद्रव्यांना पाच टक्के, दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांना १२ टक्के, तर कीडनाशकांवर १८ टक्के 'जीएसटी' आकारला जातो. ट्रॅक्टर आणि त्याच्या उपकरणांवर ६ टक्के मूल्यवर्धित कर (व्हॅट) आकारला जात होता. आता 'जीएसटी'मध्ये १२ ते १८ टक्के कर आहे. त्यामुळे ही उपकरणे महागली आहेत. एकीकडे सूक्ष्म सिंचनासाठी सरकार प्रोत्साहन देत असताना सूक्ष्म सिंचन संचांवर १८ टक्के 'जीएसटी' लावल्याने ठिबक आणि तुषार सिंचनावरील खर्चात मोठी वाढ झाली आहे. पूर्वी सूक्ष्म सिंचनावर ६ टक्के मूल्यवर्धित कर (व्हॅट) होता. थेंब थेंब पाणी वाचवण्यासाठी शेतकऱ्यांवर एकरी तीन ते चार हजार रुपयांचा भार पडत आहे. त्यामुळे विक्रीतही २० ते ३० टक्के घट झाली आहे. नैसर्गिक आपत्तीत कमी उत्पादन, वाढता उत्पादन खर्च आणि शेतमालास मिळणाऱ्या कमी दरामुळे बहुतांश शेतकऱ्यांना शेती हा व्यवसाय तोट्याचा वाटत आहे. त्यामुळे निविष्ठांवरील 'जीएसटी' सरसकट रद्द करण्याची मागणी होत आहे. खते, कीटकनाशके आणि शेती अवजारांवरील 'जीएसटी' शेतकऱ्यांकडून वसूल केला जातो. त्यामुळे खर्च वाढतच आहे. कमी उत्पादन होऊनही बाजारात शेतमालाला भाव मिळत नाही. यामुळे प्रचंड अडचणीत सापडल्याची खंत शेतकरी व्यक्त करीत आहे .

## लंके-विखे खटला सुरु; निलेश लंकेंना उच्च न्यायालयाकडून समन्स जारी!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६नगर**

अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांच्या निवडीला आव्हान देणाऱ्या माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या याचिकवेर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आज सुनावणी पार पाडली. या सुनावणीदरम्यान, खासदार निलेश लंके यांना न्यायालयाकडून समन्स बजावण्यात आले आहे. या खटल्याची पुढील सुनावणी येत्या २ सप्टेंबरला पार पडणार असून न्यायमूर्ती किशोर संत यांच्या खंडपीठासमोर हा खटला सुरु आहे.

अहमदनगर लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीकडून सुजय विखे तर महाविकास आघाडीकडून निलेश लंके मैदानात होते. लंके आणि विखे यांच्यामध्ये चुरशीची लढत झाल्याचं पाहायला मिळालं होतं. या निवडणुकीत निलेश लंके यांनी अवघ्या काही मतांनी सुजय विखे यांचा पराभव केला. या पराभवानंतर सुजय विखे



यांनी नगर दक्षिण मतदारसंघातील ३० ते ४० मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीन आणि व्हिव्हीपॅट पडताळणीची मागणी केली. या मागणीनंतर सुजय विखे यांनी पडताळणीचे शुल्कही निवडणूक आयोगाकडे भरले.

निवडणूक आयोगाकडे पडताळणीची मागणी केल्यानंतर सुजय विखे यांनी उच्च न्यायालयातही धाव घेतलीयं. निवडणूक काळात निलेश लंके यांनी निवडणूक खर्च प्रत्यक्षातील खर्च याचा ताळमेळ दिसून येत नसल्याचा दावा सुजय विखे यांच्याकडून करण्यात येत आहे. तसेच मुद्रित प्रचारातील साहित्यांचे खर्चही निलेश लंके यांनी दाखवलेले नाहीत. परिणामी लंकेंनी दाखवलेल्या खर्चात मर्यादेचे उल्लंघन झाले आहे. या अशा अनेक मुद्द्यांवरून सुजय विखे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केलीयं.

दरम्यान, या संपूर्ण घडामोडीनंतर आता उच्च न्यायालायात सुनावणी सुरु झाली. या सुनावणीमध्ये खासदार निलेश लंके यांना उच्च न्यायालयाकडून समन्स बजावण्यात आले आहे. त्यामुळे आता निलेश लंके यांना पुढील तारखेला न्यायालयात हजर रहावे लागणार असल्याचं सांगितलं जात आहे. या प्रकरणी पुढील सुनावणीत काय होणार? याकडं सर्वांचंच लक्ष लागलंय.

## उद्धव ठाकरेंची तोफ दिल्लीत गरजणार रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरेंसह ३ दिवस राजधानीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ नवी दिल्ली**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पत्नी रश्मी ठाकरे आणि मुलगा आदित्य ठाकरे हे आजपासून ३ दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. येत्या ८ ऑगस्टपर्यंत ठाकरे कुटुंब दिल्लीत असणार आहे. या दौऱ्यात उद्धव ठाकरे यांची इंडिया आघाडीतील महत्त्वाच्या नेत्यांच्या भेटीगाठी होणार आहे. महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंच्या दिल्ली दौऱ्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. या दौऱ्यातून महाराष्ट्र हिताबाबत चांगली व्यापक चर्चा होईल असं खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, उद्धव ठाकरेंचा हा दिल्ली दौरा पूर्णत: राजकीय असणार आहे. खासदार संजय राऊत यांच्या सरकारी निवासस्थानी ठाकरे कुटुंबाचा मुक्काम असणार आहे. पुढचे ३ दिवस ते इंडिया आघाडीतील नेत्यांच्या गाठीभेटी घेतील. लोकसभा निवडणुकीपूर्वी उद्धव ठाकरे यांनी दिल्ली दौरा केला होता. त्यावेळी सोनिया गांधी, राहुल गांधींसोबत त्यांनी भेट घेतली. केजरीवाल यांच्या कुटुंबालाही ठाकरे भेटले होते.

## संपादकीय ......

# मनात उमटतो श्रावण

श्रावण आला की, मनात निराळ्या लहरी उमटू लागतात. त्याच्या उन-पावसाच्या खेळाबरोबर मनही आशा-निराशेच्या लपंडावात रमतं. निसर्गानेही श्रावण महिना तयार केला असेल, तो मानवी मनाचं प्रतिबिंब म्हणूनच. त्याच्या आगमनाने पुढच्या सणांची चाहूल लागते, जशी मनाला एखाद्या पुढच्या चांगल्या घटनेचे वेध लागून त्यात उत्साह भरावा. पावसाचं मळभ दूर करून त्याची रिमझिम जशी निसर्गात बदल घडवून आणते तसंच श्रावणाच्या आगमनाने येणार्या सणांच्या चाहुलीने मन उत्साही बनतं.

मनाचं आणि श्रावणाचं म्हणूनच फार जवळचं नातं आहे. ते आपल्या संस्कृतीत, कलाकृतीत अगदी स्पष्ट उमटलंय. श्रावणसखा सगळ्यांनाच हवाहवासा वाटतो तो त्याच्या वेगवेगळ्या रूपांमुळे. आषाढाच्या झिम्माड सरींनी धरित्रीला न्हाऊ घातल्यावर तिच्यावर हळुवार हाताने साज चढवून तिला अलंकारित करण्याचं काम निसर्गाने कदाचित श्रावणावर सोपवलं असेल. म्हणूनच त्याच्याकडे धरतीला सजवण्याचं, साजश्रृंगार करण्याचं काम आहे. पावसाच्या जलधारा उदरात साठवलेली धरती त्याची फळं द्यायला उत्सुक झालेली असते आणि ते घ्यायला आपलं मन. रिमझिम पावसात मनालाही नवे धुमारे फुटतात. कधी उन -पावसाच्या खेळात त्याला जीवनाचं एखादं सत्य सापडतं, तर कधी कातरवेळी मनाच्या जखमांवर हळुवार फुंकर घालायला थोडीशी उसंत मिळते. हे सगळं वर्षाच्या यावेळीच का होत असावं? आधी उन्हाचा तडखा आणि त्यावर नंतर पावसाची सर पडून गेल्यावर दोन विरुद्ध ऋतूंमुळे मनाने आणि निसर्गानेही अनुभवलेली टोकाची रूपं त्याला येणार्या चांगल्या दिवसांची चाहूल देत असतात. आता उन्हाची काहिली नसते आणि पावसाची रिपरिपही. असतो तो हवेतला सुखद गारवा. त्यातून मनाला मिळणारी उभारी आणि येणार्या सर्जनशील काळाची नांदी. म्हणूनच कदाचित श्रावणात सणावारांची रेलचेल असते. मनाला संयम शिकवणारी व्रतवैकल्ये असतात आणि येणार्या पुढच्या सणवारांची तयारी करायला मिळालेली एक उसंतही असते.

श्रावण हे माणसाच्या मनाचं प्रतीकच आहे म्हणा ना! जीवनातला एखादा टप्पा संपून दुसर्यात प्रवेश करताना जशी मनाची मशागत करायची असते, तेच काम निसर्गात श्रावण महिन्याचं असतं. लहानपण संपून तारुण्यात प्रवेश करताना किती फुलपंखी अवस्था असते मनाची. अगदी उन- पावसाचा खेळ करणारा श्रावणच. नात्यांना समजून घेण्याची हूरहूर, मधूनच आभाळ भरून यावं तसे रुसवे-फुगवे, मग सर पडून गेल्यावर मोकळं व्हावं तशी नव्या विश्वासाने आयुष्यात येणारी नाती, त्यांची जपणूक करायला केलेले प्रयत्न, जसे देवाला प्रसन्न करून घेण्यासाठी केलेले चातुर्मासातले उपवास! कधी आनंदाची कोवळी उन्हं, तर कधी प्रेमाची रिमझिम बरसात. एवढी विविधता आयुष्याच्या अन्य कोणत्या टप्प्यावर क्वचितच पाहायला मिळते ना?

श्रावणात धरतीला जसे नवे धुमारे फुटतात तसेच ते माणसाच्या मनालाही फुटत असतील नाही का? म्हणून तर सर्जनशील मनातून निघालेली कितीतरी साहित्य रूपं श्रावणाची पाठराखण करत असतात. मनातले भाव श्रावणाच्या रूपाने व्यक्त करायला किती सोपे आहेत नाही? कधी त्यात विरहाची तहान असते, तर कधी खूप दिवसांनी भेटलेल्या प्रियकराला जाऊ न देण्यासाठी पावसालाच अखंड कोसळण्याचं घातलेलं साकडं असतं. कधी एखाद्या सासुरवाशिणीला आलेली माहेराची, या सोबत्यांबरोबर रानावनात खेळलेल्या खेळांची झालेली आठवण असते, तर कधी धरतीने पांघरलेला हिरवा साज पाहून कुणाला एखाद्या नव्या नवरीच्या साजश्रृंगाराची आठवण झालेली असते. कुणाला या श्रावणधारांत श्रीकृष्णाचं सावळं रूप दिसतं, तर कुणाला त्यात विठ्ठलाची माया. कुणी भक्तिरसात, तर कुणी निसर्गाच्या मोहक रूपात बुडालेला असतो. त्यांना व्यक्त करायला कारण एकच असतं, श्रावण! श्रावणाला महिन्यांच्या राजाची उपमा, तर अगदी चपखल आहे. अन्य कोणत्याही महिन्यात येत नाहीत एवढे सणवार या महिन्यात येतात. श्रावणी सोमवार, नागपंचमी, मंगळागौर, कृष्णजन्म ते राखीपौर्णिमेपर्यंत सर्व सणांची रेलचेलच असते या महिन्यात. नातीगोती जपायला, संवर्धन करायला आणि जीवनातले आदर्श कोणते असावेत याची नकळत दिली जाणारी शिकवण याच महिन्याकडून मिळते. शिवाय येणार्या गणपती ते दिवाळी या आनंददायी चातुर्मासाची नांदीही हा महिना देत असतो.

# स्त्रीशक्ती सन्मान पुरस्कार वितरण सोहळा १० ऑगस्ट रोजी

## रश्मी उद्धव ठाकरे, सुषमा अंधारे उपस्थित राहणार




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती** महिला सक्षमीकरणाच्या चळवळीस गती देण्याचे कर्तव्य पार पाडत विविध क्षेत्रात अतुलनीय कार्य करीत समाजापुढे आदर्श निर्माण करणाऱ्या सेवावृत्ती महिलांना शिवसेना (उबाठा) गटाकडून स्वर्गीय मॉं साहेब मीनाताई ठाकरे स्मृतीप्रित्यर्थ स्त्रीशक्ती सन्मान पुरस्कार देऊन सन्मानितकरण्यात येणार आहे. याबाबत कार्यक्रमाचे आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी माहिती दिली.स्थानिक सांस्कृतिक भवन येथे शनिवार १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता स्त्रीशक्ती सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून रश्मी उद्धव ठाकरे यांच्या हस्ते

### शिवसेना (उवाठा) गटाचे आयोजन

पुरस्कारार्थी महिलांचा सन्मान करण्यातयेणार आहे. आ. यशोमती ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यास सुषमा अंधारे खा. अरविंद सावंतयांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. स्व. मासाहेब मीनाताई ठाकरे स्मृती प्रितर्थ आयोजित या स्त्रीशक्ती सन्मान सोहळ्यास अमरावती करांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य आयोजक शिवसेना जिल्हा प्रमुख सुनील खराटे यांच्या सोबत च महिला आघाडी, मुवासेना, युवती सेना, कामगार आघाडी व समस्त शिवसैनिकांनी केले आहे.

### नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा होणार सत्कार

सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींच्या सत्कार समारंभाचे आयोजनदेखील करण्यात आले आहे. शिवसेना नेते व दक्षिण मुंबईचे खासदार अरविंद सावंत, अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख, वर्धेचे खासदार अमर काळे व मुंबई शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज. मो. अभ्यंकर या नवनिर्वाचित खासदार व आमदारांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

# 'आरटीई' प्रवेशप्रक्रिया : प्रवेशासाठी दोन दिवसांची मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती-** शालेय शिक्षण विभागातर्फे आरटीई प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया राबविली जात आहे. त्या अंतर्गत प्रवेशासाठी निवड झालेल्या २ हजार ३०० पैकी १ हजार ४३३ विद्यार्थ्यांनी आतापर्यंत प्रवेश निश्चित केले आहेत. ८६७ विद्यार्थ्यांनी अजूनही प्रवेश घेतलेला नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी शिक्षण विभागाने आता दोन दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार पालकांना आपल्या पाल्यांचे प्रवेश ८ ऑगस्टपर्यंत करता येणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी सोमवार, ५ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली होती. जिल्ह्यात आरटीई प्रवेशासाठी २३२ शाळांमध्ये२ हजार ३६९ जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी २ हजार ३०० विद्याध्यर्थ्यांची लकी ड्रॉच्या माध्यमातून निवड करण्यात आली. प्रवेशासाठी २ हजार ३०० विद्यार्थ्यांची निवड होऊनदेखील केवळ १ हजार ४३३ विद्यार्थ्यांचे प्रवेश आतापर्यंत निश्चित झाले. ८६७ पाल्यांचे प्रवेश अद्यापही झालेले नाहीत. त्यामुळे आरटीई प्रवेशासाठी मुदतवाढ देण्याची मागणी पालक तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आली होती. त्यानुसार मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांना दिलासा मिळाला आहे.

# कांदा पिकात कीड रोग येऊ नये म्हणून हे टॉप दहा उपाय वाचा सविस्तर

**दि.६ विदर्भ प्रजासत्ताक** - रोग पसरवणाऱ्या बुरशी, जिवाणू, विषाणू, कृमी आणि किडी यांचे अस्तित्व सर्वत्र व सर्व अवस्थेत निसर्गात असते. पोषक हवामान उपलब्ध झाल्यास यांची तीव्रता वाढते.

बऱ्याच वेळी महागडी औषधे फवारून सुद्धा रोग व किडींचे नियंत्रण चांगल्या प्रकारे होत नाही. अशा वेळी एकात्मिक रोग व कीड नियंत्रण आवश्यक ठरते. यासाठी खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

१) हंगामानुसार एखाद्या भागात लागवड एकाच आठवड्यात पूर्ण करावी. त्यामुळे दोन हंगामामध्ये बराच काळ अंतर राखून रोगजंतूंचा




किंवा किडींचा जीवनक्रम तोडता येईल.

२) रोपवाटिकेत व शेतात ट्रायकोडर्मा व्हिरीडी हेक्टरी १.२५ किलो ५०० किलो शेणखतात १५ दिवस आधी मिसळून जमिनीत टाकावे.

३) प्रमाणित बियाणे वापरावे. तसेच बीजप्रक्रिया अवश्य करावी.

४) पिकाची फेरपालट करावी.




५) पाण्याचा चांगला निचरा न होणाऱ्या जमिनीत कांदा लागवड करू नये.

६) रोपांची मूळे लागवडीपूर्वी दोन तास अगोदर १ ग्रॅम कार्बेन्डॅझिम व २ मिली कार्बोसल्फान प्रति लिटर पाणी या द्रावणात बुडवून लागवड करावी.

७) रोपे नेहमी गादी वाफ्यांवर लावावीत.

८)फवारणी करताना औषधाच्या द्रावणात १ लिटर पाण्यात ०.६ मि.ली. चिकटद्रव्याचा उपयोग करावा.

९) फुलकिडे व रोग याकरिता औषधांची एकत्रित फवारणी करावी.

१०) एकाच औषध सारखे वापरू नये. सतत एकाच औषध वापरल्यामुळे किडींची प्रतिकारशक्ती वाढते. म्हणून वेगवेगळी औषधे आलटून-पालटून वापरावीत.

पर्णीय रोग व कीड नियंत्रणाकरिता

अ) पुनर्लागवडीच्या ३० दिवसांनंतर मॅन्कोझेब २.५ ग्रॅम व मिथोमिल ०.८ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे, पुनर्लागवडीच्या ४५ दिवसांनंतर ट्रायसाक्लॅझॉल १ ग्रॅम व कार्बोसल्फान २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे, आणि पुनर्लागवडीच्या ६० दिवसांनंतर हेकसाकोनॅझोल १ ग्रॅम व प्रोफेनोफॉस १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

ब) पुनर्लागवडीच्या ३० दिवसांनंतर मॅन्कोझेब २.५ ग्रॅम व मिथोमिल ०.८ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे, पुनर्लागवडीच्या ४५ दिवसांनंतर प्रोपीकोनॅझोल १ ग्रॅम व कार्बो सल्फान २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे, आणि पुनर्लागवडीच्या ६० दिवसांनंतर कॉपर ऑक्सिक्लोराईड २.५ ग्रॅम व प्रोफेनोफॉस १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. अशा प्रकारे कांदा पिकात रोग व किडींचे व्यवस्थापन केल्यास गुणवत्ता पूर्ण कांद्यांचे भरपूर उत्पादन होऊन शेतकऱ्यांना त्याचा चांगला फायदा होऊ शकतो.




## पूर्ण झोप घेऊनही सकाळी फ्रेश वाटत नाही? ४ कारणांमुळे आळस, थकवा जाणवू शकतो- बघा उपाय

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक** - जेव्हा आपली झोप अपूरी होते, पुरेसा आराम मिळत नाही, तेव्हा थकल्यासारखे वाटते. सगळं अंग आळसावून गेल्यासारखं होतं. अशा वेळी आपण हातातली सगळी कामं टाकून आधी आराम केला पाहिजे. पण काही लोकांच्या बाबतीत असं होतं की ते रात्रीची पूर्ण झोप घेतात, तरीही दुसऱ्यादिवशी उठल्यानंतर त्यांना फ्रेश, उत्साही वाटत नाही. अंगातून आळस जात नाही. असं वारंवार होत असेल तर त्यामागे ५ कारणं असू शकतात, असं आहारतज्ज्ञ सांगत आहेत.



**१. डिहायड्रेशन-** जर तुम्ही पुरेशा प्रमाणात पाणी पित नसाल तर त्याचाही परिणाम तुमच्या झोपेवर होतो. पुरेसं पाणी प्यायलं नाही तर शरीरात अमिनो सिड, मेलॅटोनिन हे हार्मोन्स पुरेशा प्रमाणात तयार होत नाहीत. त्याचा झोपेवर परिणाम होतो आणि मग पुरेशी झोप घेऊनही अंगातून आळस जात नाही.

**२. स्क्रिन-** अनेक लोकांच्या बाबतीत हे मुख्य कारण आहे. रात्री झोपण्यापुर्वी जर तुम्ही हातात मोबाईल घेत असाल तर त्यामुळे तुमचा मेंदू अधिक जागरुक होतो आणि त्यामुळे तुमची झोप डिस्टर्ब होते.

**३. थायरॉईड-** जर तुमच्या शरीरातील थायरॉईड हार्मोनचे संतुलन बिघडले असेल तरीही त्याचा परिणाम झोपेवर होऊ शकतो. चयापचय क्रियेवरही त्याचा परिणाम होतो. यामुळे रात्री शांत झोप न लागणे, झोप लागली तरी दुसऱ्यादिवशी सकाळी अंगात आळस असल्यासारखा जाणवणे असा त्रास होतो.

**४. लोहाची कमतरता-** अंगात लोह कमी असेल तर त्यामुळेही तुम्हाला कायम थकल्यासारखे वाटू शकते. त्याचा तुमच्या मूडवरही परिणाम होऊ शकतो. हे तुमच्या थकव्याचे, आळसाचे कारण असेल तर त्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधी घ्यावेत. तसेच आहारातही लोहयुक्त पदार्थ अधिक प्रमाणात असावे.

# चार दिवस राज्यात मुसळधार

## विदर्भ रेड अलर्ट वर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

हवामान विभागाने पुढील ४ दिवस राज्यातील अनेक भागांत जोरदार पावसाचा अंदाज वर्तविला आहे. घाटमाथ्यावर रेड अलर्ट आहे.

गेल्या काही दिवसांपासून कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यावर अनेक भागांत जोरदार पाऊस होत आहे.

शनिवारी दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती.

पुढील चार दिवस विदर्भ, मराठवाड्यातील काही भागांतही जोरदार पावसाची शक्यता आहे. सातारा, पुणे जिल्ह्यांत अनेक ठिकाणी अतिजोरदार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे.

ऑरेंज अलर्ट:

विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, अमरावती, नागपूर, वर्धा, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांतील काही भागात ऑरेंज अलर्ट आहे.

### या जिल्ह्यांना अलर्ट

रेड अलर्ट: पुणे, सातारा घाट माथा. ऑरेंज अलर्ट : विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, अमरावती, नागपूर, वर्धा, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांतील काही भागात आहे.




### यलो अलर्ट:

कोल्हापूर, नाशिक, नगर, धुळे, जळगाव, नंदुरबार, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे.

# प्राध्यापक चांगले शिकवतात म्हणून दुसऱ्या ठिकाणी नोकरीसाठी 'एनओसी' नाही, उच्च न्यायालयात अजब प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नागपूर :** कॉलेज मधील प्राध्यापक विद्यार्थ्यांना चांगले शिकवतात. त्यामुळे त्यांना दुसरीकडे नोकरी करण्यासाठी एनओसी (ना हरकत प्रमाणपत्र) देऊ शकत नाही, असा अजब युक्तिवाद एका कॉलेजच्यावतीने उच्च न्यायालयात करण्यात आला. कॉलेजची ही भूमिका संविधानाच्या कलम १४ चे उल्लंघन असून प्राध्यापकाला कुठे नोकरी करायची आहे याचा निर्णय घेण्यासाठी ते स्वतंत्र आहेत, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला.

प्रा. आशीष टिपले असे याचिकाकर्त्याचे नाव असून ते वर्धा जिल्ह्यातील सेलू येथील आर.एस.भोयर कॉलेजमध्ये प्राणीशास्त्र विषयाचे प्राध्यापक आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने सहाय्यक प्राध्यापक पद भरतीसाठी मे महिन्यात जाहिरात काढली होती. या



पदासाठी प्रा.टिपले यांनी अर्ज करण्याचा निर्णय घेतला. या जाहिरातीमध्ये अट अशी होती की, सध्या नोकरीत असाल तर संबंधित कॉलेजचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. अर्ज करताना ना हरकत प्रमाणपत्र नसेल तर निदान मुलाखतीच्यावेळी नाहरकत प्रमाणपत्र जोडण्यात यावे अशी अट ठेवली गेली. यानुसार प्रा. टिपले यांनी ना हरकत प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सेलूमधील आर.एस.भोयर कॉलेजकडे अर्ज केला. सुरूवातीचे काही दिवस कारण न देता अर्ज प्रलंबित ठेवण्यात आला. ना-हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने प्रा.टिपले यांनी कॉलेज प्रशासनाकडे तक्रार केली. यानंतर देखील त्यांना ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही. त्यामुळे कॉलेजविरूध्द प्रा. टिपले यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. प्रकरण न्यायालयात प्रलंबित असताना प्रा. टिपले यांनी नाहरकत प्रमाणपत्रासाठी केलेला अर्ज कॉलेजने १ सप्टेंबर २०२३ रोजी रद्द केला. याचिकाकर्त्याने ही बाब न्यायालयाच्या निरीक्षणात आणून दिली. यानंतर न्यायालयाने कॉलेजची कानउघाडणी केली आणि प्राध्यापकाला तात्काळ एनओसी देण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्याच्यावतीने ॲड. आनंद परचुरे यांनी बाजू मांडली.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ६ ऑगस्ट २०२४ शहर/ग्रामिण


# अरे महादेव त्रिशुळ घालून देईन...आमदार संतोष बांगरांवर प्रहार



**दि.६विदर्भ प्रजासत्ताक हिंगोली :** प्रहार संघटनेचे प्रमुख आणि आमदार बच्चू कडू यांनी तिसऱ्या आघाडीच्या माध्यमातून आगामी विधान सभा निवडणुकांसाठी रणनीती आखायला सुरुवात केली आहे. प्रहार संघटनेचे सध्या राज्यात दोन आमदार असून स्वत: बच्चू कडू हे त्यापैकीच एक आहेत. त्यामुळे, लहान सहान पक्षांना सोबत घेऊन तसेच मनोज जरांगे पाटील यांच्याशीही त्यांची चर्चा सुरू असल्याचे समजते. याच दरम्यान, आमदार बच्चू कडू विविध जिल्ह्यात जाऊन आढावा घेत आहेत. आज हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील एका कार्यक्रमात बोलताना बच्चू कडू यांनी नाव न घेता आमदार संतोष बांगर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. आमदार बांगर यांच्यावर टीका करताना बच्चू कडूंची जीभ घसरल्याचं पाहायला मिळालं.

बच्चू कडू हे अपक्ष आमदार आहेत, पण शिवसेनेला पाठिंबा देत त्यांनीही गुवाहटी गाठलं होतं. त्यामुळे, ते महायुतीत असल्याचं स्पष्ट झालं, मात्र सातत्याने आपली भूमिका स्पष्ट करताना ते सत्ताधाऱ्यांवर टीका करताना दिसून येतात. आजही कमळमनुरी मतदारसंघात भाषण करताना त्यांनी मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केलं. तसेच, आमदार संतोष बांगर यांच्यावरही प्रहार केलाय. ''आपली लढाई गरीब कष्टकरी आणि शेतकऱ्यांची आहे, ५० माणसं घेऊन जाणाऱ्या एसटीच्या ड्रायव्हरला १२ हजार रुपये महिना मिळतो आणि १ माणूस घेऊन जातो, त्या कलेक्टरच्या ड्रायव्हरला ४५ हजार रुपये महिना भेटते, अरे सालो तुम्हारे बाप का राज है क्या बच्चू कडु अभि जिंदा है,उखाड के फेकना है इन लोगो को,'' असे म्हणत आमदार बच्चू कडू यांनी सत्ताधाऱ्यांवर व प्रशासनातील अधिकाऱ्यांवर निशाणा साधला. तुमच्या बापाचं राज्य आहे का, तुमचा संडास पाच लाखांचा अन् आमचं घर सव्वा लाखांचं, लाज नाही वाटत का तुम्हाला, हे कोणी विचारत नाही, असे बच्चू कडू यांनी म्हटले. तसेच, घेतली कावड की निघाला महादेवाला, अरे महादेव त्रिशुळ घालीन की ढुंगणात असे म्हणत बच्चू कडू यांनी कळमनुरीचे आमदार संतोष बांगर यांचे नाव न घेता टीका केलीय, यावेळी टीका करतांना आमदार कडू यांची जीभ घसरल्याचं दिसून आलं.

### मुख्यमंत्र्यांवरही निशाणा साधला

दोन आमदार घेऊन फिरतोय तरी विधानसभेत घाम फोडल्याशिवाय राहात नाही. शेतकरी, शेत मुजरांच्या प्रश्नावर काम करतोय. १५-२० आमदार आले तर मुख्यमंत्र्याचा गणपती करु, उचलून नेऊन टाकू समुद्रात, त्यासाठी तुमची साथ हवी आहे. आम्हाला तुमचे आशीर्वाद पाहिजेत, असे अचलपूरचे आमदार बच्चू कडू म्हणाले आहेत. ते हिंगोलीमध्ये बोलत होते.

### बच्चू कडूंकडून २५ जागांची चाचपणी

तिसऱ्या आघाडीसाठी बच्चू कडूंनी २५ जागांसाठी चाचपणी केली आहे. सरकारकडे आमच्या १८ मागण्या आहेत त्या जर पूर्ण झाल्या तर आम्ही निवडणूकच लढणार नाही. आम्ही जातीय समीकरणे जोडून एकत्र येणार नाही. राजू शेट्टी, मनोज जरांगे, चखच् सोबत आमचे जे मुद्दे आहेत त्यावरच एकत्र बसू अन्यथा आम्ही बसणार नाही. वेळ आली तर एकटे लढू. मात्र मुद्द्यांवर ज्या ज्या पक्षाचं एक मत होईल त्यांच्यासोबत आम्ही लढू. आमचे मुद्दे हे सर्व जातीमधील शेतकरी कष्टकरी मजुरांचे आहेत. आम्ही इतके मोठे नाही की प्रकाश आंबेडकरांना सोबत घेऊ किंवा त्यांच्यासोबत जाऊ. तो त्यांचा विषय आहे, असंही बच्चू कडू यांनी सांगितलं.

# लाडक्या बहिणींना 'लव्ह जिहाद' पासून वाचवा

## हिंदू जनजागृती समितीचे आंदोलन, कठोर कायद्याची मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती,-** महाराष्ट्र सरकारने 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' चालू केली आहे; मात्र सध्या 'लव्ह जिहाद'च्या धोक्यामुळे हिंदू युवती आणि महिला अजूनही असुरक्षित आहेत आणि त्यांच्या निर्घृण हत्या सुरूच आहेत. 'लाडकी बहीण' योजनेच्या आधी बहिणींना सुरक्षा द्या, बहिणींच्या सुरक्षेसाठी राज्यात तात्काळ 'लव्ह जिहाद' विरोधी कायदा करावा, अशी आग्रही मागणी अमरावती येथील राजकमल चौकात ५ ऑगस्ट रोजी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने आयोजित 'हिंदु-राष्ट्र जागृती आंदोलना'त करण्यात आली.

उरण येथील २२ वर्षीय यशश्री शिंदे हिची अत्यंत क्रूरतेने आणि मानवतेला काळीमा फासणारी हत्या करण्यात आली. यशश्रीची हत्या करणार्या नराधम आरोपीला तात्काळ भरचौकात फाशी देण्यात यावी, ही मागणीही या वेळी करण्यात आली. हिंदु जनजागृति समितीच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या या आंदोलनात हिंदु जनजागृती समितीची रणरागिणी शाखा, सनातन संस्था आदी संघटनांचे कार्यकर्ते तसेच हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या प्रतिनिधींसह महिला, युवती आणि धर्मप्रेमी हिंदू सहभागी झाले होते. याप्रसंगी आंदोलनात सहभागी झालेल्या हिंदूंनी हातात प्रबोधनपर फलक धरले होते आणि घोषणाही देण्यात आल्या. या वेळी शासनाला देण्यात येणार्या निवेदनावर लोकांच्या स्वाक्षर्या घेण्यात आल्या. राज्यात दिवसेंदिवस महिला-मुलींवरील वाढते अत्याचार रोखण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारच्या धर्तीवर 'अँटी रोमियो स्कॉड' सारखी पोलिसांची विशेष शाखा स्थापन करावी, मुसलमान युवक आणि हिंदु युवती यांच्या प्रेमप्रकरणांच्या तक्रारी 'लव्ह जिहाद' म्हणून नोंदवल्या जाव्यात, तसेच या प्रकरणांत काही धर्मांध आणि कट्टरतावादी जिहादी संघटना, जिहादी नेते, परकीय शक्ती आढळून आल्यास त्यांची पाळेमुळे खणून काढावीत. त्यांच्यावरही तत्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, आदी मागण्याही या आंदोलनात करण्यात आल्या.

# जिल्ह्यात ८० नवी रेशन दुकाने

## डीएसओ कार्यालयाने मागवले प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती -** अमरावती जिल्ह्याच्या १२ तालुक्यातील ८० गावांमध्ये नवीन रास्त भाव (रेशन) दुकाने सुरू करण्याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाने प्रस्ताव मागविले आहेत. इच्छूक संस्था व बचत गटांना त्यासाठीचे प्रस्ताव आगामी १६ ऑगस्टपूर्वी सादर करता येतील, असे संबंधित यंत्रणेने स्पष्ट केले आहे.



अमरावती तालुक्यातील नांदुरा लष्करपूर, कराळे मोगरा, कुऱ्हाड, नांदुरा (बु.) व लोनटेक, भातकुली तालुक्यातील बोकुरखेडा, काकरखेडा, उदापूर, मक्रमपूर, देगूरखेडा, अडवी, कृष्णापूर, मक्रंदाबाद, कोलटेक, पोहरा, पुर्णा, सरमपूर, इब्राहिमपूर व उमरापूर, तिवसा तालुक्यातील घोटा, आलवाडा व जहांगीरपूर येथे नवी दुकाने दिली जाणार आहेत. याशिवाय चांदुर बाजार तालुक्यातील अब्दलपूर, मौजखेडा, पिंपरी तळेगाव, पांढरी, हिरापूर, वारोळी व खरवाडी, अचलपूर तालुक्यात मेघनाथपूर व खानापूर. दर्यापूर तालुक्यातील शहापूर, नांदुरा, चांदूर जाहनपूर व चंद्रपूर, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सर्फाबाद व औरंगपूर आणि वरूड तालुक्यातील जामगाव (महेंद्री), पिंपलागड व वरूड येथेही नव्या दुकानांची गरज आहे.

तर दुसरीकडे चांदुर रेल्वे तालुक्यातील चांदुरखेडा, कोदोरी हरक व चांदुरवाडी, नांदगाव खंडेश्वर तालुक्यात जसापूर, बोरगाव, पिंप्री पोच्छा, निंभोरा लाहे व भगुरा, चिखलदरा तालुक्यात कुही, भुत्रुम, भिंरोजा, केशरपूर, भांडुम, ढाकणा, खिरपाणी, पांढराखडक, खटकाली (ख.), सोमठाणा खुर्द, सलिता, सुमिता, डोमी, चिलाटी, माडीझडप, लाखेवाडा, लवादा, टेटू, लवादा वन, मोझरी, बागलिंगा, रामटेक, कुलंगना (बु), मांजरकापडी, चौऱ्यामल, खुटीया व मेमना तसेच मोर्शी तालुक्यातील सिंभोरा, अंबाडा, शिरूळ, कोळविहीर, निंभार्णी, हाशमपूर अशा ८० गावांमध्ये रास्तभाव दुकानांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

### असा आहे प्राधान्यक्रम

नवीन रास्तभाव दुकानांसाठी संस्थेची निवड करताना ग्रामपंचायत किंवा तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था, नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था आणि संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत नोंदणी झालेल्या सार्वजनिक संस्था किंवा न्यास यांना अर्ज करता येईल. याच प्राथम्यक्रमानुसार रास्तभाव दुकानांचे परवाने मंजूर केले जातील. परवान्यानंतर त्या दुकानांचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदयाव्दारे करणे आवश्यक राहिल, असे जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी स्पष्ट केले आहे.

# 'त्या' ग्रामसेवकाच्या चौकशीसाठी समिती:आठवडाभरात मागवला अहवाल; सीईओ संजीता महापात्र यांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती** अमरावती मेळघाटातील दहेंद्री ढाणा (ता. चिखलदरा) येथे दुषित पाणी पुरवठ्यामुळे एका व्यक्तीला प्राण गमवावे लागले असून ४१ जण रुग्णालयात दाखल असल्याचे पुढे आले आहे. या पार्श्वभूमीवर तेथील ग्रामसेवकाची चौकशी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीइओ) यांनी एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नेतृत्वात समिती नेमली आहे. या समितीने आठवडाभराच्या आंत अहवाल द्यावा, असे त्यांचे निर्देश आहेत.

दहेंद्री ढाणा येथे जलजन्य आजाराचे थैमान हा विषय रविवारी जिल्हा नियोजन समितीच्या अजेंड्यावर आला होता. त्या बैठकीतच सभाध्यक्ष या नात्याने स्वत: पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी ग्रामसेवकाच्या चौकशीचे निर्देश दिले होते. त्यानुसार सीईओ संजीता महापात्र यांनी आज, सोमवारी अतिरिक्त सीइओ संतोष जोशी यांच्या नेतृत्वात चौकशी समिती नेमली. ही समिती आठवडाभराच्या आंत चौकशी पूर्ण करुन आपला अहवाल सादर करेल.

त्यानंतर ग्रामसेवकावरील कारवाईची दिशा स्पष्ट होणार आहे. याप्रकरणी ग्रामसेवकासह दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जावी, अशी मागणी काही लोकप्रतिनिधींनी डीपीसी बैठकीत नोंदवली होती. शिवाय स्वत: जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांनी तेथील (तीनपैकी दोन शासकीय सोडून) एका खाजगी विहिरीत सांडपाणी मिसळल्या गेल्याचे सभागृहात स्पष्ट केले होते.




माहितगार सूत्रांच्या मते नरेंद्र इंगळे हे तेथील ग्रामसेवक आहेत. तर सरपंच रवि बेठेकर आहेत. सुमारे ६०० लोकसंख्या असलेल्या या गावातील हे दोन्ही सेवक योग्यरित्या कामकाज करित आहेत. सदर घटना घडण्यापूर्वी त्यांनी तेथील दोन्ही शासकीय विहिरींमधील पाण्याचे शुद्धीकरण केले होते. मात्र ज्या नागरिकांनी दूरवरच्या शेतातील खाजगी विहीरीच्या पाण्याचा वापर केला, त्यांच्याच प्रकृतीमध्ये बिघाड झाला. सध्या त्या विहिरीवरुन पाणी घेण्यास मनाई करण्यात आली आहे. दुसरीकडे रुग्णालयात दाखल अनेक जण बरे झाले असून दहेंद्री ढाणा येथे तीन टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे.

### आठवडाभरात अहवाल मागवला

दहेंद्री येथील प्रकरणाच्या अनुषंगाने माननीय पालकमंत्री महोदयांनी चौकशीचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार अतिरिक्त सीइओंच्या नेतृत्वात समिती गठित करण्यात आली आहे. या समितीला आठवडाभराच्या आंत अहवाल मागण्यात आला आहे.**-संजीता महापात्र,** सीइओ, जिल्हा परिषद, अमरावती.

# वॅगन प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला द्यावा

## मुंबई रेल्वे अधिकाऱ्यांना निवेदनातून मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती -**बडनेरा येथील रेल्वे वेंगन प्रकल्पासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना मोबदला म्हणून अधिग्रहित जमीन मालकाला किंवा त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेण्याची कायद्याची तरतूद केली होती.

याविषयी प्रकल्पग्रस्त एकूण ४४ शेतकऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींकडे गाऱ्हाणी मांडली. मात्र, अनेक वर्षांनंतरही कुठलीही कार्यवाही झाली नसून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंबीय मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

त्यामुळे संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांनी वॅगन प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला त्वरित द्यावा, यासाठी रेल्वेचे मुंबई कार्यालय गाठून अधिकाऱ्यांना वास्तविकता लक्षात आणून दिली.

मुंबई येथील रेल्वे अधिकाऱ्यांकडे, याबाबत वास्तविक परिस्थितीचा आढावा विषद करून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात मोबदल्याची योग्य रक्कम जमा करून कुटुंबातीलव्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेण्यासंदर्भातील मागणी नितीन कदम यांनी निवेदनातून रेल्वेच्या सामान्य प्रशासन विभागाचे सचिव उमंग दुबे यांच्याकडे सुपूर्द केले. त्याचप्रमाणे बडनेरा ते नागपूर मार्गाने धावणाऱ्या रेल्वे गाडीमध्ये अनेक मल्टी टास्किंग स्टाफ कर्मचारी आपल्या मासिक पासद्वारे प्रवास करतात. गेल्या अनेक वर्षांपासून जागेअभावी उभे राहून एक ते दीड तासाचा प्रवास पूर्ण करावा लागतो.



त्यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन यांच्याकरिता त्याच डब्यात किंवा गाडीमध्ये पर्यायी व्यवस्था उपलब्ध करण्यात यावी, या आशयाचे निवेदन देण्यात आले.

# मेळघाटवासियांच्या कायम सेवेत राहणार

## गुणवंत विद्यार्थांचा सत्कार

## नवनीत राणा यांची ग्वाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती, -** लोकसभा निवडणुकीत मी पराभूत झाल्यामुळे मेळघाटच्या विकासाला खीळ बसल्याची भावना मेळघाटवासियांमध्ये आहे. पण, मी पदावर असो किंवा नसो मेळघाटची मुलगी म्हणून सतत मेळघाटवासियांच्या सेवेत राहणार असल्याची ग्वाही माजी खासदार छर्रीपशर्शी ठरपर नवनीत राणा यांनी दिली.

राणा दाम्पत्याच्या वतीने गुणवंत विद्यार्थांच्या सत्काराचे आयोजन सोमवारी धारणी येथील रंगभवन येथे करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. पुढे त्या म्हणाल्या, ५ वर्षाच्या खासदारकीच्या कार्यकाळात मेळघाटातील गावागावात विकासाची गंगा आणून मेळघाटचे नाव संपूर्ण देशात पोहोचविले. आदिवासी बांधवांचे जगणे सुसह्य केले. लोकसभा निवडणुकीत मेळघाटवासियांनी २६ हजाराचे मत्ताधिक्य देवून आपल्यावरील प्रेम सिद्ध केल्याबद्दल सर्वांचे आभार. आता प्रत्येक गावागावात जावून नागरिकांच्या घेणार असल्याची घोषणा त्यांनी केली. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रीद्वय देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी लाडकी बहीण योजना, लाडका भाऊ योजना, शेतकर्यांना वीज बिल माफ योजना, वर्षाला ३ सिलेंडर मोफत योजना आदी योजनांचा लाभ मेळघाटच्या जनतेने घेण्याचे आवाहन आमदार रवी राणा यांनी केले. काही अडचण आल्यास महायुतीच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी आमदार केवलराम काळे, प्रभुदास भिलावेकर, आप्पा पाटील, रमेश मावस्कर, रेखा मावस्कर, ज्योती सैरिसे, मालती कास्देकर, दुर्गा बिसांदरे, क्षमा चौकसे, ज्योती सोळंके, सारिका पाटणकर, लक्ष्मण जांभेकर, दुर्योधन जावरकर, निरज मालविय, देवेंद्र टिब, मनिष मालविय, मुकेश मालविय, आप्पासाहेब पाटील, शाम गांगर्डे, सुभाष गुप्ता, नालमवार काका, सुधाकर पकडे, मुन्नीताई भिलावेकर, गायत्री धोत्रे, तन्नु शेख, शांता जांभेकर, ललिता जावरकर, उपेन बछले, सुरळकर मामा, मंगेश पांडे, सोनु धनेगावकर, सागर श्रीवास्तव, लोकेश मालविय, बंटी ठाकुर, रामदास धोत्रे, माधुरी जावरकर, शोयेब मेमन, वैभव गोस्वामी,मोनु मालविय, अरुणा वाघमारे, राजेंद्र सारगे, राहील शेख यांच्यासह हजारोच्या संख्येने आदिवासी महिला-पुरुष उपस्थित होते.



# खादी महोत्सव प्रदर्शनीला जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिली भेट

## नागरिकांनी प्रदर्शनीचा लाभ घ्यावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** खादी वस्त्र जनसामान्यांना उपलब्ध होण्यासाठी खादी व ग्रामद्योग मंडळाच्यावतीने खादी महोत्सव प्रदर्शनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अमरावती येथे लावण्यात आली आहे. या प्रदर्शनीला आज जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी भेट देऊन खादी उत्पादनाची माहिती जाणून घेतली. प्रदर्शनीमध्ये विविध दर्जेदार खादी उत्पादने विक्रीस उपलब्ध असून या प्रदर्शनीचा नागरिकांनी लाभ



घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर उपस्थित होते. खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत ग्रामीण भागातील उद्योजकासाठी विविध अर्थसहाय्य योजना राबविण्यात येते. ग्रामीण भागात उद्योग उभारणी केलेल्या खादी व ग्रामोद्योगी वस्तूंना शहरी भागात बाजारपेठ व ओळख मिळवून देण्याचे कार्य मंडळामार्फत केले जाते. प्रधानमंत्री यांनी मन की बात या कार्यक्रमात केलेल्या आवाहनानुसार खादी वस्त्रांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि खादीचा प्रचार, प्रसार व वापर वाढावा यासाठी मंडळ विविध उपक्रम राबवित असतात. त्याअनुषंगाने खादी महोत्सव प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले असून ही प्रदर्शनी शुक्रवार दि. ९ ऑगस्टपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहिल. या प्रदर्शनीचा नागरिकांनी लाभ घ्यावा.

# तीन दिवसांपासून युनियन बँकेतील व्यवहार ठप्प ग्राहकांत संताप

## दोषीवर कारवाईची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अंजनगाव सुर्जी** ८तीन दिवसांपासून युनियन बँकेतील व्यवहार ठप्प ग्राहकांत संताप; दोषीवर कारवाईची मागणी स्थानिक युनियन बँक ऑफ इंडिया शाखेतील पूर्ण व्यवहार तांत्रिक कारणामुळे गत तीन दिवसांपासून पूर्णपणे बंद असल्याने ग्राहकांमध्ये संताप व्यक्त केला आहे. बँकेचा संपूर्ण कारभार पूर्णपणे ठप्प झाला असून, याचा मोठा परिणाम ग्राहकांच्या व्यवहारावर झाला आहे. गेल्या चार दिवसांपासून युनियन बँकेत ग्राहक चकरा मारत आहेत. १ ते ३ ऑगस्टपर्यंत बँकेचे कामकाज बंदअसल्याने ग्राहकांना बँकेतून आल्या पावली परत जावे लागले. त्यामुळे ग्राहकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. कामबंद असल्यामुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, महिलावर्ग या सर्व ग्राहकांना व्यवहार करणे कठीण होऊन गेले आहे. बँकेतील तांत्रिक कारणामुळे बँकेचे एटीएमसुद्धा बंद आहे. त्यामुळे ग्राहकांची कोंडी झाली आहे. या प्रकाराला दोषी असलेल्यावर कारवाईची मागणी ग्राहकांनी केली आहे.

# पुन्हा चार कोरोनाबधित, तीन स्वाइन फ्लूूचे रुग्ण आढळले

## दहा नमुने पुणे येथे तपासणीकरिता, स्वाइन फ्लूच्या रुग्णांवर इर्विनला उपचार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतून गत आठवड्यात शुक्रवार आणि शनिवारी असे दोनदिवस ११४ रुग्णांच्या नमुन्यांची चाचणी करण्यात आली असून, यात चार कोरोना पॉझिटिव्ह, तर स्वाइन फ्लूचे तीन रुग्ण आढळले आहे. दहा रुग्णांचे नमुने पुणे येथील शासकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. त्यामुळे अमरावती शहरात झपाट्याने कोरोना आणि स्वाइन फ्लूचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे चित्र आहे.

विद्यापीठ प्रयोगशाळेचे नोडल अधिकारी डॉ. प्रशांत ठाकरे यांच्यामाहितीनुसार, आरोग्य प्रशासनाकडून शुक्रवार २ ऑगस्ट रोजी ९४ रुग्णांचे नमुने तपासणीसाठी आले होते. त्यापैकी चार रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. तर यात दहा





रुग्णांचे नमुने पुणे येथे चाचणीकरिता पाठविले आहेत. या दहा रुग्णांचा चाचणी अहवाल या आठवड्यात प्राप्त होण्याची शक्यता आहे. तर शनिवार, ३ ऑगस्ट रोजी २० रुग्णांचे नमुने तपासणीसाठी आले असता यात ३ रुग्णांना स्वाइन फ्लू (एच-१ एन-१) असल्याचे स्पष्ट झाले आहे. हे तिनही रुग्ण





येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत आहेत. अचानक वातावरणात झालेला बदल आणि पावसाचे दिवस असल्यामुळे साथरोग बळावत आहे. घाणीचे साम्राज्य, डासांचा प्रादुर्भाव हे देखील - कोरोना, स्वाइन फ्लूूचे रुग्ण वाढीस कारणीभूत ठरत आहे.

# पीक पेरा नोंदणीला झाली सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ कुऱ्हा** जिल्ह्यात तीन वर्षांपासूनमोबाइलवरील ई-पीक पाहणी ॲपवर पीक पै-याची नोंदणी केली जात आहे. यंदाही १ ऑगस्टपासून ही नोंदणी सुरू झाली असून पीक पे-याचे आधारे शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत मिळणारी मदत, ओला दुष्काळ मदत, पीक कर्जवाटप, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले पिकांचे नुकसान, कीड व रोग यामुळे झालेले नुकसान या सर्वांसाठी पीक पेराची नोंद महत्त्वाची ठरणार आहे. यासाठी सर्व शेतकरी बांधवांनी ई-पीक पाहणी ॲपचेद्वारे आपल्या





पिकांची नोंद करून घ्यावी असे आवाहन तिवसा तालुका कृषी अधिकारी नीलेश राठोड यांनी केले आहे.

राज्य सरकारच्या भूमिअभिलेख व जमाबंदी आयुक्तालयाने ऑगस्ट २०२१ मध्ये शेतकरी पातळीवर पीक नोंदणीसाठी ई-पीक पाहणी ॲप उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे सातबारा उताऱ्यावर पिकांची नोंद करण्यासाठी तलाठी यांच्याकडे न जाता. शेतात जाऊन स्वताला पिकांची नोंद करता येते. पीक पेऱ्याची नोंद करण्याचा कालावधी हा १ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर असा आहे. भूमिअभिलेख विभागाने आता ई-पीक पाहणीचे नवीन सोपे व्हर्जन आणले असून, या ॲपमुळे शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी केल्यानंतर काही सुधारणा करावयाची असल्यास ४८ तासात दुरुस्ती करता येणार आहे. जियो फेन्सिंग या सुविधेमुळे पिकांचे अचूक छायाचित्र घेतले किंवा नाही है ठरविता येणार आहे. त्यामुळे शेतातील पिकांचे फोटो नीट दिसणार आहेत.

# रिल्स बनवताना तरुण-तरुणी पडले ५० फूट खोल खाणीत

## मासोद येथील घटना; बचाव पथकाने काढले बाहेर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मासोद –** शहरानजीकच्या मासोद शिवारातील बंद खाणीजवळ १७ ते १८ वर्ष वयोगटातील एक तरुण व तरुणी रिल्स तयार करण्यासाठी गेले होते. यावेळी तरुणीचा तोल गेल्यामुळे ती ५० फुट खोल खाणीत पडली, तर तिला वाचवण्याच्या नादात तरुणही खाली कोसळला. गंभीर जखमी झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केले.

### दोघांनाही रुग्णालयात पोहोचवले

रिल्स तयार करण्यासाठी गेलेला एक मुलगा व मुलगी सुमारे ५० फुट खाणीत पडले. ही खाण सध्या बंद आहे. दोघांनाही बचाव पथकाच्या मदतीने रुग्णालयात पोहोचवले. त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

**– नीलेश करे, पोलिस निरीक्षक, फ्रेजरपुरा.**



ही घटना रविवारी सायंकाळी घडली असून, त्या दोघांनाही पोलिस व बचाव पथकाने रविवारी रात्री साडेआठ वाजता खाणीतून बाहेर काढले. मासोद शिवारात मोठ्या प्रमाणात गिट्टी खाणी आहेत. त्यापैकी काही खाणींमधील उत्खनन पूर्ण झाल्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या आकाराचे खड्डे तयार झाले आहेत.

दरम्यान खाणीत पडलेला तरुण शहरातील वडाळी परिसरातील रहिवासी असून, तो रविवारी सायंकाळी मासोद परिसरात गेला होता. या वेळी सुमारे ५० फुट खोल व पाच एकर क्षेत्रात पसरलेल्या एका मोठ्या खदानीच्या वर हे तरुण तरुणी रिल्स तयार करण्याच्या तयारीत होते. या वेळी मुलगी ॲक्टिंग करत होती, तर मुलगा तिची रिल्स तयार करत होता. दरम्यान ॲक्टिंगच्या नादात ती मुलगी थेट खाणीत पडली. तिला वाचवण्याच्या नादात शूटिंग करत असलेला तो मुलगा सुद्धा खाणीत पडला. दोघेही ५० फुटावरून पडल्यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाली होती. मुलगा बेशुद्ध झाला होता. हा परिसर फार वर्दळीचा व गजबजलेला नाही. त्यामुळे मुलीने बचावासाठी आरडाओरड केली मात्र सुरुवातीला कोणालाही आवाज पोहोचला नाही. दरम्यान काही वेळानंतर खदानीच्या परिसरातील एका व्यक्तीला आवाज गेला. त्याने तत्काळ ही माहिती फ्रेजरपुरा पोलिसांना दिली.

पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन व बचाव पथकाला माहिती दिली. ते पथक तत्काळ पोहोचले.

रात्रीची वेळ व खाणीत ४ ते ५ फुट पाणी असल्यामुळे त्या ठिकाणी जाण्यास अडचण येत होती. मात्र एक किमी. जंगल भागातून पायी जात तासाभराच्या प्रयत्नानंतर पोलिस व बचाव पथक जखमी स्थितीतील मुलगा व मुलीजवळ पोहोचले व त्यांना रुग्णालयात पोहोचवले.

# दर्यापुरात छत्रपतींचा पुतळा उभारण्यासाठी शिवसेना आक्रमक

## पालकमंत्र्यांच्या आढावा बैठकीदरम्यान अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ दर्यापूर–** शहरात मागील ३५ वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा उभारण्यासंबंधी समस्या व अडचणी असताना शिवसेना (शिंदे गट) जिल्हा प्रमुख गोपाल पाटील अरबट यांनी पुढाकार घेऊन दोन वेळा नियोजित जागी पुतळा बसवला होता. परंतु, शासनाने तो ताब्यात घेत अरबट यांच्यासह कार्यकत्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली होती. दरम्यान गोपाल पाटील अरबट यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून व कागदपत्रांची पूर्तता करून पुतळा बसवण्यासंबंधी हालचाली सुरू



केल्यात. मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणेला पुतळा बसवण्यासाठी आदेश दिले असतानाही अधिकाऱ्यांनी मात्र त्यांच्या आदेशाला केराची टोपलीदाखवली दरम्यान पालकमंत्रीचंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी (दि. ४) पार पडलेल्या जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत अरबट यांनी छत्रपतींचा पुतळा बसवण्याच्या प्रकरणावरून पालकमंत्र्यांसमोर अधिकाऱ्यांना धारेवर धरले. या प्रसंगी गोपाल अरबट यांची आक्रमकता पाहून काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.दर्यापूर मधील पुतळ्याच्या उभारणीसाठी कोणीही कसोशीने प्रयत्न केले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यास एवढा अधिकाऱ्यांचा दुजाभाव कशासाठी, असा प्रश्न सुद्धा गोपाल पाटील अरबट यांनी या वेळी केला. १५ ऑगस्टपर्यंत अधिकाऱ्यांनी रितसर कागदपत्रांची पूर्तता करून छत्रपती शिवरायांचा पुतळा बसवण्या बाबत आदेश दिला नाही, तर तीव्र स्वरूपात आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

# नया अकोला येथील जि.प. माध्य. शाळेतील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नया अकोला** अमरावती तालुक्यातील नया अकोला येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत वर्ग नववी दहावी या दोन वर्गासाठी शाळेत शिकवण्यासाठी शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचं शिक्षण धोक्यात येताना पहायला मिळत आहे मराठी इंग्रजी गणित विज्ञान या चार प्रमुख विषयांचे शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचं शिक्षणाचं मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे नया अकोला जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक मच्छिंद्र अभ्यंकर यांनी आता पर्यंत जवळपास तीन वेळा शिक्षण विभागाशी पत्र व्यवहार केला आहे मात्र अद्यापही त्यांच्या पत्रांची दखल घेतली गेली नाही विद्यार्थी व विद्यार्थिनी दररोज शाळेत येतात मात्र त्यांना एकाही विषयाचं शिक्षण मिळत नसल्याचं पाहायला मिळत आहे सोबतच काही विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुध्दा मोठ्या प्रमाणात खालावत जात आहे अश्यातच गावातील काही नागरिकांनी शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून त्यांच्याशी चर्चा सुद्धा केली आहे मात्र चर्चेतून उडवा उडवीचे उत्तर भेटत असल्यामुळे गावकरी मात्र नाराज आहेत काही विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या मुलांना शाळेत चांगल शिक्षण मिळत नसल्यामुळे शाळा सोडण्यासाठी अर्ज सुद्धा दाखल केले आहे एकीकडे राज्य सरकार व शिक्षण मंत्री बेटी बचाव बेटी पढाव अशा घोषणा देत आहे तर दुसरीकडे आताचं



राज्य सरकारने लाडली बहन योजना सुरू केली आहे मात्र शाळेतील तरुण विद्यार्थी बहिणींना शिक्षणा पासून वंचित ठेऊन त्यांना अशिक्षित बनवण्याचा हा प्रयत्न चालू आहे का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे सरकारचे अपयश आणि प्रशासनाचे वेळकाढू धोरणामुळे हा सर्व खेळ खोळंबा चालू आहे शाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या पूर्ण असून सुद्धा शाळेत शिक्षक दिल्या जात नाही हि शोकांतिका आहे सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार एक शिक्षक आणि मुख्याध्यापक यांची बदली नया अकोला येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत झाली आहे आहे मात्र ते सध्या जिथे कार्यरत आहेत तिथुन त्यांना सध्या रिलीव्ह करण्यात आले नाही आहे शाळेत शिक्षक नसल्यामुळे गावकरी मोठ्या प्रमाणात संतापले आहे या सर्व प्रकरणावर शिक्षण विभागाचे अधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा लक्ष देतील का हे पाहन महत्वाचं ठरणार आहे.

# तलाठी शिक्षण मदत पेटी हा ग्रामस्थांचा चमत्कार

## गझलनवाज भीमराव पांचाळे यांचे गौरवोद्गार, मदत पेटीत १ लाख ६८ हजार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती** संत गाडगेबाबांच्या कृतीशील विचारांचा आदर्श जामगाव खडका येथील तलाठी सुनील राऊत यांनी आपल्या कृतीतून घालून दिला आहे. गरजू, हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी तलाठी शिक्षण मदत पेटीतून होत असलेली आर्थिक मदत हा ग्रामस्थांच्या मदतीने साकारलेला समाज व्यवस्थेतील चमत्कार असल्याचे प्रतिपादन गझलनवाज भीमराव पांचाळे यांनी केले. क्रूड तालुक्यातील जामगाव (खडका) येथे रविवारी (दि. ४) तलाठी शिक्षण मदत पेटीतील रकमेच्या लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी कार्यक्रमाचे उद्घाटक शेतकरी नेते विजय विल्हेकर, गीता पांचाळे, प्रदीप म्हैसणे, ताज खान आदी उपस्थित होते. तलाठ्याची नोकरी करताना आपण समाजाचे देणे - लागतो, या भावनेतून सुनील राऊत -यांनी १२ वर्षांपूर्वी एकलारा या गावी तलाठी शिक्षण मदत पेटी हा अभिनव उपक्रम सुरू केला. या उपक्रमात ग्रामस्थांच्या मदतीतून आज विविध ठिकाणी विद्यार्थी उच्च



शिक्षण घेत न आहे, ही मोठी उपलब्धी आहे. एक प्रशासकीय अधिकारी आपल्या संकल्पनेतून, ग्रामस्थांना सोबत घेत कशी किमया साधू शकतो आणि गरजवंतांची कशी मदत करू शकतो, याचे उत्तम उदाहरण यापेक्षा दुसरे असू शकत नाही, असे गझलनवाज भीमराव पांचाळे म्हणाले. अशा सुनीलच्या पाठीशी समाजाने उभे राहावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले. या प्रसंगी शिक्षण मदत पेटीत ५ हजार रुपयांची मदतही भीमराव पांचाळे यांनी केली. कार्यक्रमानंतर सर्वांच्या उपस्थितीत मदत पेटी उघडण्यात आली. या पेटीत गेल्या चार महिन्यात गावकऱ्यांनी तब्बल १ लाख ६८ हजार ७६९ रुपये रोख व डिजिटल बँकिंगद्वारे १६ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम जमा केली. ही सर्वरक्कम विविध महाविद्यालयात शिकत असलेल्या, स्पर्धा परीक्षेची तयारी करत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. कार्यक्रमास जामगावच्या सरपंच लीला कुमरे, उपसरपंच नीलेश ठाकरे, माजी सरपंच मनोज पेलागडे, पत्रकार नितीन पखाले, गझलकार प्रफुल्ल भुजाडे, पळसोनाचे सरपंच सुमित गुर्जर, खडकाचे सरपंच राहुल फुले, दीपक जवंजाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अमर मेटे, अतुल घोंगडे, अमोल बनसोड यांचा सत्कार केला. प्रास्ताविक प्रदीप म्हैसने यांनी केले. सूत्रसंचालन योगेश गावंडे यांनी केले, तर आभार सुनील राऊत यांनी मानले.

# २८३४३ विद्यार्थ्यांना थेट शाळेत मिळाली बस पास

## प्रशासकीय संचालकांकडूनही विभागाचे कौतुक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

राज्य परिवहन (एसटी) महामंडळ अमरावती विभागाने यावर्षी १ जुलैपासून नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाले तेव्हापासून आजपर्यंत जिल्ह्यातील २८ हजार ३४३ विद्यार्थ्यांना थेट शाळांमध्ये दैनंदिन प्रवासाचे पास वितरित करून नवा विक्रम केला आहे. ज्यासाठी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष तथा प्रशासकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनीही अमरावती विभागाच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.अमरावती विभाग नियंत्रक नीलेश बेलसरे यांनी सांगितले की, यावर्षी जिल्ह्यातील १९ हजार ११४ विद्यार्थिनींना त्यांच्या शाळा व महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर योजनेंतर्गत मोफत पासचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे ९ हजार २२९ विद्यार्थ्यांना ६६ टक्के सवलतीत दैनंदिन प्रवासी पासचे वाटप करण्यात आले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे पास वितरण २२ टक्के अधिक आहे.

यंदा मध्यंवर्ती आगाराने विद्यार्थी प्रवासी पास वाटपाची जबाबदारी विभागातील सर्व ८ आगार व्यवस्थापकांवर सोपवली होती. वाहतूक नियंत्रक योगेश ठाकरे व सर्व आगार व्यवस्थापक यांच्या पथकाने चांगली कामगिरी केली. त्यामुळे या वर्षी अधिकाधिक विद्यार्थ्यांना एसटीच्या दैनंदिन प्रवासाच्या पासचा लाभ मिळाला. त्यामुळे महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासही मदत झाली आहे. तसेच यावर्षी विद्यार्थ्यांची सोय लक्षात घेऊन जिल्ह्यातील ९ गावांमध्ये शाळेच्या वेळापत्रकावर आधारित नवीन बसफेऱ्याही सुरू करण्यात आल्या आहेत.

**विद्यार्थी प्रवासी पासचा डेपो तपशील**

| आगार | या वर्षी २०२४ | | गेल्या वर्षी २०२३ | |
|---|---|---|---|---|
| | विद्यार्थी | विद्यार्थीनी | विद्यार्थी | विद्यार्थीनी |
| अमरावती | १४०१ | १२७६ | ११९१ | १०७७ |
| बडनेरा | ४६१ | १४३३ | ३७३ | ९०६ |
| परतवाडा | ३३४ | ३१७२ | ३६१ | १७५९ |
| वरुड | ९८६ | २५७३ | ९१९ | १७१३ |
| चांदूर रेल्वे | २१९० | ४२२८ | २२०९ | ८५९ |
| दर्यापूर | १३०४ | २०१० | ११७९ | १५४० |
| मोर्शी | १३२६ | २२३३ | १२१४ | १४१८ |
| चांदूर बाजार | १२१७ | २१८९ | १०६५ | १४४० |
| एकूण | ९,२२९ | १९,११४ | ८,५११ | १०,७१२ |

# विदर्भातील प्रादेशिक असमतोल स्वरुप, आव्हाने आणि उपाय' या विषयावर

## विद्यापीठात ९ ऑगस्ट रोजी सेमिनारचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्र व विदर्भ अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ९ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी १०.०० ते ५.०० दरम्यान विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राच्या सभागृहात 'विदर्भातील प्रादेशिक असमतोल : स्वरुप, आव्हाने आणि उपाय' या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या सेमिनारमध्ये 'विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या आणि शेतीसमोरील आव्हाने', 'दरडोई सकल जिल्हा उत्पन्न आणि विकास', 'शैक्षणिक आणि आरोग्याची पायाभूत सुविधा',




'जलसिंचनाची सध्यस्थिती आणि अनुशेष', 'विदर्भातील उद्योगाची स्थिती आणि आव्हाने', 'विदर्भातील रोजगाराचे प्रश्न आणि उपाय', 'समन्यायी विकास आणि विकासाचे वाद प्रश्न', 'महाराष्ट्राचा असमतोल विकास, संदर्भ विदर्भ प्रदेश', 'प्रादेशिक असमतोल आणि विषमता', 'दारिद्रए, असमानता आणि विकास', 'सामाजिक सुरक्षितता आणि प्रादेशिक विकास', 'जिल्हानिहाय विकासाची प्रवृत्ती', 'औद्योगिक विकास, असंतुलन आणि अडथळे', 'विकासाचे मूलभूत प्रश्न आणि भविष्याची व्यूहरचना' या उपविषयावर उहापोह होणार आहे.विद्यार्थी, शिक्षक तसेच संशोधनकर्त्यांनी hrrqt://formr.gle/E87H${n38bd2rD$bak8 या लिंकवर आपली नोंदणी करावी. अधिक माहितीकरीता सेमिनारचे संयोजक तथा डॉ. पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे यांच्याशी ९४२१७३९९९६ व विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे सचिव डॉ. संजय कोठारी यांचेशी ९१५८३६६४६५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.

# सततच्या पावसामुळे पिकांवर औषधी फवारणी करण्यास अडचण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

मृग नक्षत्रात पेरणी होऊन जोमात आलेले सोयाबीन गतवर्षीची कसर भरून काढेल असे वाटत असताना, जिल्ह्यातील सुमारे तीन लाख हेक्टरवरील सोयाबीन पिकावर पाने आणि फुले खाणाऱ्या अळीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला आहे. पाऊस फवारणीसाठी उसंत देत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता आणखीनच वाढली आहे. अळीचा प्रादुर्भाव वेळीच न रोखल्यास हाती आलेले सोयाबीन वाया जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुसरीकडे सखल भागातील पिके पाण्यामुळे पिवळी पडली आहेत. उत्पादनात घट होण्याची शक्यता असल्याने जिल्ह्यातील शेतकरी चिंतीत झाले आहेत.मागील काही वर्षांपासून कमी जास्त पावसामुळे होत असलेले पिकांचे नुकसान, पीक कर्जासाठी झालेली फरफट, दिवसागणिक वाढत जाणारी महागाई, खते व बियाण्यांच्या वाढलेल्या भरमसाठ किंमती यासह इतर संकटाचा सामना करत शेतकऱ्यांनी यंदा जवळपास तिन लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी केली आहे. परंतु हे पीक ऐन बहरात असतानाच त्यावर विविध कीटक आणि अळ्यांचा प्रादुर्भाव वाढला आहे.

# ७० हजारांवर लाडक्या बहिणींचे अर्ज झाले मंजूर

## रक्षाबंधनाआधी अर्ज भरण्यासाठी लागली चढाओढ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

जिल्ह्यात आजवर ७० हजारावर लाडक्या बहिणींचे अर्ज त्यात कोणतीही त्रुटी नसल्यामुळे मंजूर करण्यात आले आहे. या योजनेची घोषणा झाल्यापासून जिल्ह्यात सुमारे ४ लाख बहिणींनी अर्ज भरले आहेत. त्यापैकी ५८ अर्ज खारीज, तर ५ हजार २५९ अर्ज नामंजूर करण्यात आले. या ७० हजारावर अर्जाशिवाय अन्य अर्जावर विचार सुरू असल्याची माहिती जिल्हा महिला बालविकास अधिकारी डॉ.


कैलास घोडके यांनी दिली. या योजनेसाठी अर्ज करण्यास ३१ ऑगस्ट ही अंतिम मुदत असून, तत्पूर्वीच रक्षाबंधनाच्या पर्वावर लाडक्या बहिणींना योजनेचा पहिला हप्ता दिला जाणार आहे. तत्पूर्वीच आपले नाव पात्र यादीत चढावे असे लाडक्या बहिणींना वाटत असल्यामुळे सध्या मनपाच्या झोन कार्यालयात अर्ज सादर करण्यास चढाओढ लागली आहे. ॲपवर ऑनलाइन अर्ज केल्यानंतर त्याची हार्ड कॉपी मनपा अंगणवाडी सेविकांकडे आवश्यक दस्तावेज जोडून सादर करावी लागते. सर्व दस्तावेजांची तपासणी केल्यानंतर मग अर्ज पात्र की अपात्र याबाबत निर्णय घेतला जातो. यासाठी मनपाच्या झोन क्र. २ मध्ये मुख्य कार्यालय थाटण्यात आले असून, शनिवारीही येथे कर्मचारी अर्जाची छाननी करत आहेत.

# पुन्हा चार कोरोनाबाधित, तीन स्वाइन फ्लूचे रुग्ण आढळले

## दहा नमुने पुणे येथे तपासणीकरिता, स्वाइन फ्लूच्या रुग्णांवर उपचार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतून गत आठवड्यात शुक्रवार आणि शनिवारी असे दोनदिवस ११४ रुग्णांच्या नमुन्यांची चाचणी करण्यात आली असून, यात चार कोरोना पॉझिटिव्ह, तर स्वाइन फ्लूचे तीन रुग्ण आढळले आहे. दहा रुग्णांचे नमुने पुणे येथील शासकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. त्यामुळे अमरावती शहरात झपाट्याने कोरोना आणि स्वाइन फ्लूचा




प्रादुर्भाव वाढत असल्याचे चित्र आहे.


विद्यापीठ प्रयोगशाळेचे नोडल अधिकारी डॉ. प्रशांत ठाकरे यांच्यामाहितीनुसार, आरोग्य प्रशासनाकडून शुक्रवार २ ऑगस्ट रोजी ९४ रुग्णांचे नमुने तपासणीसाठी आले होते. त्यापैकी चार रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह - आढळून आले आहेत. तर यात दहा

रुग्णांचे नमुने पुणे येथे चाचणीकरिता पाठविले आहेत. या दहा रुग्णांचा चाचणी अहवाल या आठवड्यात प्राप्त होण्याची शक्यता आहे. तर शनिवार, ३ ऑगस्ट रोजी २० रुग्णांचे नमुने तपासणी साठी आले असता यात ३ रुग्णांना स्वाइन फ्लू (एच-१ एन-१) असल्याचे स्पष्ट झाले आहे. हे तिनही रुग्ण येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत आहेत. अचानक वातावरणात झालेला बदल आणि पावसाचे दिवस असल्यामुळे साथरोग बळावत आहे. घाणीचे साम्राज्य, डासांचा प्रादुर्भाव हे देखील कोरोना, स्वाइन फ्लूचे रुग्ण वाढीस कारणीभूत ठरत आहे.

# ०३८ - अमरावती विधानसभा मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी प्रसिध्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ चे अनुषंगाने दिनांक ०१, जुलै २०२४ या अहर्ता दिनांकावर आधारित प्रारुप मतदार यादी दिनांक ०६ ऑगस्ट, २०२४ रोजी ०३८-अमरावती विधानसभा मतदारसंघातील सर्व ३२२ मतदान केंद्र तसेच अमरावती महानगरपालिका, तहसील कार्यालय, अमरावती व उपविभागीय अधिकारी कार्यालय, अमरावती यांचे नोटीस बोर्डावर लावून प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.



सदरची प्रारुप मतदार यादी शासकीय कामाकाजाचे वेळेत मतदार नोंदणी अधिकारी, ०३८-अमरावती विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालयात अवलोकनाकरीता उपलब्ध करण्यात आलेली आहे. सर्व संबंधित मतदारांनी सदर यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या नावाबाबत किंवा कोणत्याही तपशिलाबाबत काही आक्षेप असल्यास दि.२० ऑगस्ट, २०२४ रोजी किंवा त्यापुर्वी मतदार नोंदणी अधिकारी, ०३८-अमरावती विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालयास आक्षेप दाखल करता येतील, तसेच जर आपले नाव मतदार यादीमध्ये नसेल तर नाव समाविष्ट करण्याकरीता नमुना-६ तसेच नाव किंवा इतर तपशिलात दुरूस्ती करावयाची असल्यास नमुना-८ भरून व नाव वगळायचे असल्यास नमुना-७ भरुन मतदार नोंदणी अंधिकारी, ०३८ - अमरावती विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालयास दि.२० ऑगस्ट, २०२४ रोजी किंवा त्यापुर्वी सादर करण्याचे आवाहन मतद्वारांना करण्यात आलेले आहे.

अमरावती विधानसभा मतदारसंघाची दि. ०१ जुलै, २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाचा सुधारीत कार्यक्रम २०२४ नुसार सर्व मतदान केंद्रावर दि. १० ऑगस्ट, २०२४ (शनिवार), दि. ११ ऑगस्ट, २०२४ (रविवार), दि. १७ ऑगस्ट, २०२४ (शनिवार) व दि.१८ ऑगस्ट, २०२४ (रविवार) रोजी विशेष मतदार नोंदणी शिबीर राबविण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित मतदान केंद्रावर उपस्थित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बिएलओ) यांचेकडे नविन मतदार नोंदणी, तपशिलात दुरुस्ती अथवा नाव वगळणी करता येईल.

# सावंगा सेवा सहकारी सोसायटी मध्ये राजाभाऊ ऊंबरकर पॅनल विजयी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील सावंगा सेवा सहकारी सोसायटी र. न. ९१४ ची निवडणूक नुकतीच पार पडली.या निवडणूकीमध्ये राजेन्द्र उर्फ राजाभाऊ उंबरकर पॅनलचा दणदणीत विजय झाला.या निवडणूकीमध्ये राजाभाऊ ऊंबरकर गटाचे सर्वच्या सर्व १३ पैकी १३ उमेदवार



बिनविरोध निवडून आले. विजयी ऊमेदवारांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

विजयी उमेदवारांमधुन राजेंद्र उर्फ राजाभाऊ उंबरकर हे अध्यक्षपदी विराजमान झाले तर उपाध्क्षपदासाठी मज्जित खा सौदागर विजयी झाले . संचालक पदी अनवर खा सौदागर, प्रेमदास मळसने, अरविंद महल्ले, योगेश राऊत, देविदास राव बोरवाल, ज्ञानेश्वर कडू, प्रवीण खेडकर, संजय उंबरकर, नंदकिशोर उंबरकर, श्रीमती रेखाताई घोगडे, सौ . करूनाताई उंबरकर.या सर्व सभासदांची सोसायटी चे संचालक निवड करण्यात आली. विजयी उमेदवारांचे सावंगावासियांतर्फे जंगी स्वागत करण्यात आले.

# मौदा तालुक्यातील कंपनीत स्फोट, एका कामगाराचा मृत्यू, सहा गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ नागपूर**

झुल्लर (ता. मौदा, जिल्हा नागपूर) शिवारातील श्री. जी. ब्लॉक या सिमेंट विटा तयार करणाऱ्या कंपनीत मंगळवारी (दि. ६) सकाळी स्फोट झाला. यात एका कामगाराचा होरपळून मृत्यू झाला तर सहा कामगार गंभीर जखमी झाले. सर्व जखमींना नागपूर शहरातील हॉस्पिटलमध्ये भरती केले आहे.

नंदकिशोर करंडे (४०) असे मृत कामगाराचे नाव आहे. नंदकिशोर हा कंपनीत आठ वर्षांपासून क्रेन ऑपरेटर



म्हणून कार्यरत होता. मंगळवारी सकाळी कंपनीत विटा तयार करण्याचे काम सुरू होते. अचानक स्फोट झाला आणि कामगार घाबरले. या स्फोटात नंदकिशोरचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर अन्य सहा कामगार गंभीर जखमी झाले. त्यांची नावे कळू शकली नाही. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठले व जखमी कामगारांना नजीकच्या हॉस्पिटलमध्ये नेले. प्रथमोपचारानंतर त्यांना नागपूर शहरातील हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले. हा स्फोट नेमका कशाचा व का झाला हे अद्याप स्पष्ट झाले नाही. मात्र सिमेंट कॉंक्रीट मिक्सर मशीनच्या कॉम्प्रेसरचा हा स्फोट असावा असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# अमरावतीत मजुराची 'लक्ष्मी' पीएसआयची परीक्षा उत्तीर्ण

## आमदारांकडून मुलीसह आई-वडिलांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

मनात जिद्द अन् चिकाटी असली तर कोणतेही ध्येय, उद्दिष्ट गाठता येते. यात परिस्थिति आड येत नाही, ही बाब एका मजुराच्या मुलीने एमपीएससीतून पोलिस उपनिरीक्षकाची परीक्षा उत्तीर्ण होऊन सिद्ध केली आहे. लक्ष्मी राजेश तेलंग असे या मुलीचे नाव असून वडील बांधकाम सेंट्रिग मजूर तर आई मोलमजुरी करून कुटुंबाचा गाडा चालवितात, हे विशेष.

अमरावतीच्या महाजनपुरा भागातील मारुतीनगर येथील रहिवासी असलेल्या राजेश तेलंग यांची कन्या लक्ष्मी हिने अत्यंत विपरीत



परिस्थितीवर मात करून पीएसआयची परीक्षा उत्तीर्ण करून तेलंग परिवाराची शान वाढविली आहे. तिच्या यशामुळे आजीचे स्वप्न पूर्ण झाले आहे. 'लक्ष्मी' हिच्या यशाचे कौतुक करण्यासाठी आमदार रवी राणा हे मारुतीनगरात पोहोचले. आई-वडिलांसह लक्ष्मीचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात. तसेच लक्ष्मी हिच्या घरच्या परिसरातील रस्ता खराब असल्याने या रस्ता दुरुस्तीसाठी आमदार रवी राणा यांनी दिला १० लाख रुपयांचा आमदार निधी मंजूर केला.

यावेळी आमदार रवी राणा यांच्या समवेत भूषण पाटणे, पराग चिमोटे, नाना सावरकर, अविनाश काळे, गणेशदास गायकवाड, कृष्णा तेलंग, नेहा तेलंग, सुमन तेलंग, उषा तेलंग, राजेश तेलंग, शीला तेलंग, रोहित तेलंग, सागर तेलंग आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरावर बाजी मारणाऱ्या मंडळाला मिळणार भव्य बक्षीस

## पहिले बक्षीस ५ लाखांचे उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

जिल्ह्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. जिल्हास्तरावर यासाठी समितीचे गठन करण्यात आले असून या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी राहणार आहेत राज्यातील पहिल्या तीन विजेत्या क्रमांकांना अनुक्रमे पाच लाख, अडीच लाख रुपये व एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. राज्यातील पहिल्या विजेत्यांबरोबरच राज्य समितीकडे जिल्हास्तरीय समितीने निवड केलेल्या ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपैकी वरीलप्रमाणे तीन विजेत्या गणेशोत्सव मंडळांना वगळून उर्वरित ४१ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. या पुरस्कारासाठीच्या २४ लाख



६० हजार रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.


धर्मादाय आयुक्त आणि स्थानिक पोलिसांकडे नोंदणी आवश्यक या पुरस्कारांसाठी निवड होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी विविध निकष असतील. त्यांना गुणदिले जातील.या स्पर्धेत धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार असल्याची माहिती देण्यात आली.

**होणार अभिप्रायासह गुणांकन**

जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हास्तरीय समितीचे सदस्य सचिव असतील. निवड समिती प्रत्यक्ष उत्सवस्थळी भेट देतील तसेच मंडळाकडून व्हिडीओग्राफी व कागदपत्र जमा करून घेतील. जिल्हास्तरीय समितीकडून प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत अभिप्रायासह गुणांकन करण्यात येईल.

# आयकर भरत असाल तर बंद होणार रेशन

## उत्पन्न अधिक असतानाही उचलतात रेशनचे धान्य



### .....तर होऊ शकते ही कारवाई

एखाद्या शिधापत्रिकाधारक आयकर भरत असूनही ते स्वस्त धान्याचा लाभ घेत असेल किंवा धान्याची उचल करत असेल आणि त्यांनी कार्ड पुरवठा विभागाकडे वापस केले नसेल तर सरकार त्या व्यक्तीकडून २७ रुपये प्रति किलोप्रमाणे धान्याची किंमत वसूल करू शकते. अपात्र ठरल्यापासून केलेल्या धान्याच्या उचलीची रक्कम वसुली केली जाते.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार जे कार्डधारक आयकर भरतात, त्यांना मोफत रेशन मिळत असलेली शिधापत्रिका रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचे चोख पालन करत शासनस्तरावरून पाठविण्यात आलेल्या यादीतील शिधापत्रिका प्राधान्याने रद्द करण्याची कार्यवाही पुरवठा विभागाकडून सुरू करण्यात आली आहे. उत्पन्न अधिक असलेल्या कार्डधारकांनी रेशनवरील धान्य सोडून देणेच हिताचे ठरणार आहे.कायद्यानुसार, जे लोक आयकर भरतात, त्यांना शासनस्तरावरून पुरविण्यात येणारे मोफत रेशन घेता येत नाही. याशिवाय ज्यांच्याकडे दहा एकरांपेक्षा अधिक शेतजमीन आहे. अशा मंडळींनाही मोफत धान्य दिले जाऊ नये, असे शासनाचे निर्देश आहेत. दरम्यान, अशा लोकांची यादी तयार करून ती त्या-त्या जिल्ह्याकडे यापूर्वीच शासनाने पाठविली आहे. त्यात नमूद लोकांचे धान्य मिळणारे कार्ड रद्द करून संबंधितांना पांढरी शिधापत्रिका देण्याची कार्यवाही केली जात आहे.ज्यांनी चार महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपासन स्वस्त धान्यदुकानदाराकडे जाऊन धान्यादी मागणी केलेली नाटी आधार लिंक केले नाही, अशा लाभार्थ्यांचेही कार्ड रद्द होणार आहे.शासनस्तरावरून आयकर भरणाऱ्यांची यादी पुरवठा विभागाकडे पाठविण्यात आली आहे. त्यानुसार गेल्या काही दिवसांत संबंधितांची शिधापत्रिका रद्द करून पांढरी शिधापत्रिका देण्यात आली. सध्या स्थितीत १८६ आयकर भरणाऱ्यांचे रेशन बंद झाले आल्याची माहिती आहे.

# गटप्रवर्तकांवर केंद्र सरकारचा अन्याय:अमरावतीच्या खासदारांकडे 'आयटक'ची तक्रार

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.८अमरावती**

आरोग्य यंत्रणेला मदत करण्यासाठी गाव पातळीवर कार्यरत असलेल्या गटप्रवर्तक महिलांवर केंद्र व राज्य सरकारतर्फे अन्याय केला जात असल्याची तक्रार ऑल इंडियन ट्रेड युनियन काँग्रेसने (आयटक) केली आहे. त्यामुळे गटप्रवर्तक महिलांनी आज, सोमवारी सकाळी विश्राम भवनात खासदार बळवंतराव वानखडे यांच्याकडे कैफीयत मांडली. गटप्रवर्तकांना कंत्राटी कर्मचाऱ्याचा दर्जा द्या, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

गेल्या अनेक वर्षांपासून काम करीत असतानाही गटप्रवर्तकांना कर्मचाऱ्याचा दर्जा मिळाला नाही. केवळ तुटपुंज्या मानधनावरच त्यांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवावा लागतो. शिवाय मानधन देतानाही महिन्याला विशिष्ट रुग्णसंख्येचे लक्ष्य आखून दिले जाते. ही बाब अन्यायकारक असल्यामुळे सदर गटप्रवर्तक महिलांनी यापूर्वीही अनेकदा आंदोलने केली आहेत. बळवंतराव वानखडे हे जिल्हा परिषद सदस्य आणि पुढे आमदार ते खासदार असा प्रवास करीत असताना त्यांनी ही आंदोलने वेळोवेळी अनुभवलेली आहेत. त्यामुळे आम्हाला आमच्याकडून अपेक्षा आहेत, आपण खासदार म्हणून आमचा प्रश्न संसदेत लावून धरत त्याची सोडवणूक करावी, अशी विनंती यावेळी संबंधित गटप्रवर्तकांनी केली.

राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत सन २००८ पासून कंत्राटी कर्मचारी पद्धतीने गटप्रवर्तकांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु मानधनाबाबत केंद्र व राज्य अशा दोन्ही सरकारांनी आमच्यावर सातत्याने अन्याय केला, अशी मांडणीही यावेळी करण्यात आली.

# 'वॉटरप्रूफ कलरफूल' पाकिटातून लाडक्या भावाला पाठवा राखी

## डाक विभागाचा उपक्रम दहा रुपयांच्या पाकिटावर दोन रुपये जीएसटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

रक्षाबंधनासाठी डाक विभागातर्फे विशेष राखी कव्हर तयार केले आहे. डिजिटल शुभेच्छांच्या युगात प्रत्यक्ष मिळालेली राखी आणि ती देखील विश्वासार्ह डाक विभागाकडून म्हणून तिचे महत्त्व जास्त आहे. अशातच डाक विभागामार्फत लाडक्या भावाला राखी पाठविण्यासाठी स्पेशल वॉटरप्रूफ राखी कव्हर मुख्य डाक ऑफिससह अन्य शाखांमध्ये उपलब्ध झाले आहे. मात्र, दहा रुपयांच्या एका पाकिटासाठी लाडक्या बहिणीला दोन रुपये जीएसटी मोजावा लागत आहे.बहीण-भावामधील अतिशय महत्त्वाचा सण म्हणून रक्षाबंधनाचा सण मानला जातो. हा सण सोमवारी १९ ऑगस्टला सर्वत्र साजरा होणार आहे. यासाठी ज्या बहिणीला भावाकडे अथवा भावाला बहिणीकडे प्रत्यक्ष जाता येत नाही, त्या बाजारातून राखी खरेदी करून साध्या लहान, मोठ्या - पाकिटामध्ये पाठवितात.

यंदाही डाक विभागाने स्पेशल - राखी पाकिटे उपलब्ध करून दिली - आहेत. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे आकर्षक राखी वॉटरप्रूफ पाकीट पोस्टात उपलब्ध झाले आहे. या पाकिटामध्ये राखी भरून बहिणी आपल्या भावासाठी राखी पाठवू शकतात. जे भाऊ मोठ्या शहरांत काम करतात, जे भाऊ सीमेवर राहून आपल्या देशाचे रक्षण करतात, अशा विविध कारणांमुळे ज्या बहिणी भावाला भेटू शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाचे हे आकर्षक व रंगीत राखी पाकीट उपलब्ध केले आहे.बदलत्या काळात संवाद, संपर्काची माध्यमेही बदलली आहेत.' सोशल मीडिया व ई-मेलच्या जमान्यात मेसेजद्वारे शुभेच्छा संदेश पाठवून किंवा व्हिडीओ करून रक्षाबंधन साजरे केले जाते. मात्र, प्रत्यक्षात भावाला राखी पाठवून रक्षाबंधन साजरे करण्यात वेगळाच आनंद मिळत असून पोस्टात राखी पाठविण्यासाठी गर्दी वाढत चालली आहे.




### वॉटरप्रूफ पाकीट

डाक विभागाने राखी पौर्णिमेनिमित्त वॉटरप्रूफ पाकिटे उपलब्ध करून दिली आहेत. वॉटरप्रूफ असल्याने भिजण्याचा धोका नाही. विविध आकर्षित रंगांतील पाकिटाला डिंक लावण्याची गरज भासणार नाही. या प्री-गम पाकिटावरील स्टिकर काढून ते चिकटवता येते.

# राज्यपालपदासाठी ८ दिवस वाट पाहीन, नाहीतर राणांचं जातवैधता प्रमाणपत्र प्रकरण बाहेर काढीन : शिंदे गटाचे नेते आनंदराव अडसूळ आक्रमक

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि माजी केंद्रीय मंत्री आनंदराव अडसूळ हे चांगलेच आक्रमक झाले आहेत. 'राज्यपालपदासाठी ८ दिवस वाट पाहणार अन्यथा नवनीत राणा यांचं जातवैधता प्रमाणपत्राचं प्रकरण बाहेर काढणार' असा इशारा अडसूळ यांनी दिला आहे. त्यामुळे माजी खासदार नवनीत राणा यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच अडसूळ यांच्या या भूमिकेमुळे महायुतीतही धूसफूस सुरू होऊ शकते.

भारतीय जनता पक्षाने राज्यपाल पदाचे आश्वासने दिले होते, मात्र ते पाळले नसल्याचाही आरोप अडसूळ यांनी केला आहे. त्यामुळेच अडसूळ यांनी आता ही आक्रमक भूमिका घेत आठ दिवस वाट पाहू असे जाहीर केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने नवनीत राणा यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबद्दल जो निर्णय दिला होता तो अयोग्य होता, असा अडसूळ यांचा आरोप आहे. त्यामुळे नवनीत राणा यांना दिलेल्या जातवैधता प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालया याचिका दाखल करणार असा इशाराही माजी मंत्री आनंदराव अडसूळ यांनी दिला आहे. त्यामुळे माजी खासदार नवनीत राणा यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

काही महिन्यांपूर्वी देशभरात लोकसभा निवडणूका पार पडल्या. त्यावेळी राज्यातील अमरावतील लोकसभा मतदार संघात महायुतीत भाजपातर्फे नवनीत राणा यांना उमेदवारी देण्यात आली होती. त्यांच्याविरोधात महायुतीतील शिवसेनेचे आनंदराव अडसूळ होते. दुसरीकडे प्रहारचे बच्चू कडू यांनी आपला उमेदवार जाहीर केला होता. नवनीत राणाविरुद्ध दोन्ही नेते माघार घेण्याच्या तयारीत नव्हते. परंतु अखेर आनंदराव अडसूळ यांनी माघार घेतली.

अमित शाह यांच्यासोबत झालेल्या त्या बैठकीनंतर अडसूळ यांनी माघार घेतली. त्या बैठकीत अमित शाह यांनी अडसूळ यांना राज्यपाल करण्याचे आश्वासन दिले होते. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते, असा दावा अडसूळ यांनी केला होता.

'मला देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल करण्याचे सांगितले. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मला बोलवले. त्यांनी अमरावतीची जागा भाजपला हवी असल्याचे सांगितले. महायुतीचा घटक पक्ष असल्यामुळे मी माघार घेतलीय त्यावेळी अमित शाह यांनी मला राज्यपाल करण्याचा शब्द दिला. बैठकीला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सुध्दा उपस्थित होते' असे आनंदराव अडसूळ यांनी सांगितले.



### भाजपाने दिलेला शब्द पाळावा

मात्र आता लोकसभा निवडणुका होऊन बराच कालावधी उलटला आहे. मात्र आता देशातील विविध राज्यातील राज्यपालांची एक नवी लिस्ट निघाली, त्यामध्ये माझं नाव नाहीये. तरी मी संयम ठेवला, दोन दिवसांनी भाजप नेत्यांना जाऊन भेटलो. लोकसभा निवडणुकीवेळी जे आश्वासन देण्यात आलं होतं, त्याची आठवण करून दिली, असे अडसूळ यांनी सांगितलं.राज्यपाल पदासाठी अजून आठ दिवस वाट बघतो, नाहीतर नवनीत राणा यांच जात वैधता प्रमाणपत्राचं प्रकरण पुन्हा बाहेर काढेन, असा इशारा त्यांनी दिला. नवनीत राणा यांच्या मुळे माझं खूप नुकसान झालं आहे. तेव्हा (लोकसभेत) मला उमेदवारी दिली असती तर मी निवडुन आलो असतो आणि मंत्री देखील झालो असतो, असेही अडसूळ म्हणाले.

# विद्यार्थी गुणवत्ता विकास महाअभियान साहेब करणार प्रत्येक शाळांची पडताळणी : योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत शाळांचीच 'परीक्षा'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

प्रत्येक विद्यार्थ्यांस गुणवत्तापूर्ण दर्जाचे शिक्षण देणे, हे शालेय शिक्षण विभागाचे ध्येय आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येत आहेत. मात्र, शाळांमध्ये या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होते काय, याची पडताळणी करण्यासाठी 'विद्यार्थी गुणवत्ता विकास महाअभियान' हाती घेण्यात आले आहे. ही एकप्रकारे शाळांसाठीचीच परीक्षा राहणार आहे. ऑगस्ट महिन्यात केंद्रप्रमुखांपासून शिक्षणाधिकारी आणि उपसंचालक शाळांना भेटी देऊन पडताळणी करणार आहेत.

विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येत असताना फलनिष्पत्तीचा विचार करून सुधारणा करणे आवश्यक असते. सर्व योजनांचीप्रभावी अंमलबजावणी होते काय, त्यांना कोणकोणत्या अडथळ्यांचा सामना करावा लागतो. त्यात आवश्यकतेनुसार कोणता बदल करणे आवश्यक आहे, याचाही अभ्यास या माध्यमातून करण्यात येणार आहे. महिनाभर प्रत्येक शाळेत पर्यवेक्षीय अधिकारी भेट देणार असून, शिक्षक विद्यार्थ्यांना कसे शिकवितात, यापासून ते शाळांतील भौतिक सुविधांची नोंद घेणार आहेत. तयार करण्यात आलेला अहवाल शिक्षण विभागाकडून वरिष्ठांकडे पाठविण्यात येणार आहे.



### या मुद्द्यांची घेणार नोंद

अभियानात १६ मुद्द्यांची नोंद घेण्यात येणार आहे. यात स्वास्थ्य पत्रिकानुसार करण्यात आलेल्या उपाययोजना, इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती, गणेश उपलब्धता, प्रधानमंत्री पोषण शक्ती भोजन, दर्जा, परसबाग विकास स्थिती, स्वयंपाकगृह, स्काऊट गाईड प्रशिक्षण तासाचे आयोजन, विविध संस्थांनी शासनासोबत केलेल्या कराराची अंमलबजावणी, वर्गखोल्यांची स्थिती, स्वच्छतागृह, स्वच्छता मॉनिटर उपक्रम, अध्ययन-अध्यापन साहित्याची उपलब्धता, ई-अध्ययन, शाळांमध्ये इंटरनेट सुविधा, दप्तरांच्या ओझ्याची स्थिती, पाठ्यपुस्तकातील कोया पानांचा उपयोग, विद्यार्थी उपस्थिती व आधार नोंदणी, आनंददायी शनिवार अंमलबजावणी, शाळांची वेळ ठरविण्याबाबतची स्थिती आदी मुद्द्यांचे निरीक्षण करण्यात येणार आहे.

### उलट तपासणीचे निर्देश

अधिकारी व कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त शाळा तपासणीचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले. आहे. दिलेल्या मुद्द्यांवर प्रभावी निरीक्षण करून बिनचूक माहिती संकलित करावी लागणार आहे. पर्यवेक्षीय अधिकारी त्यांच्या उद्दिष्टांव्यतिरिक्त अधिनस्त कर्मचाऱ्यांनी केलेल्या निरीक्षण शाळांची आवश्यकतेनुसार उलट तपासणी करणार आहेत. तसे निर्देश शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिले आहेत.